श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे
अधिकृत नियतकालिक

मे-जून २०१९ * रुपये ८/-

# साईलीला

स्थापना १९२३



# रामनवमी उत्सवातील साईसमाधीचे रामाच्या फोटोसह मंगल दर्शन...



# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## व्यवस्थापन समिती




डॉ. सुरेश काशिनाथ हावरे
(अध्यक्ष)




ॲड. मोहन मोतीराम जयकर
(सदस्य)



डॉ. राजेंद्र राजाबली सिंह
(सदस्य)




श्री. भाऊसाहेब राजाराम वाकूचौरे
(सदस्य)



श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे
(सदस्य)



सौ. योगिताताई अभय शेळके
(पदसिद्ध सदस्य)



श्री. दीपक मधुकर मुगळीकर, भा.प्र.से.
(सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी)



इंटरनेट आवृत्ती : URL : http://www.shrisaibabasansthan.org

● टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : रु. ५०/- ● आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/- ● परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : रु. १०००/-



● कार्यालय ●

'साईनिकेतन', ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. दूरध्वनी : (०२२)२४१६६५५६,
फॅक्स : (०२२)२४१५०७९८, ई-मेल : saidadar@sai.org.in
※ शिर्डी कार्यालय : मु. पो. शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर. दूरध्वनी : (०२४२३)२५८५००
फॅक्स : (०२४२३)२५८७७० ई-मेल : 1. saibaba@shrisaibabasansthan.org 2. saibaba@sai.org.in



- आवरण व अन्य पृष्ठे सजावट : समीर गोरे (पुणे), सिध्दीविनायक ग्राफिक्स (पुणे) फोन : ९३७०१४२६७६
- संगणकीय अक्षर जुळणी : ओके क्रिएशन, पुणे ● मुद्रित शोधन : सौ. अपर्णा जोशी
- मुद्रण स्थळ : मधुरा प्रिंट सोल्युशन्स्, बी-२४, अंबड एम.आय.डी.सी., नाशिक - १0. मो. ७८८७८९७६७८
- प्रकाशक व मुद्रक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक मधुरा प्रिंट सोल्युशन्स्, बी-२४, अंबड एम.आय.डी.सी., नाशिक - १० येथे छापून 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४ येथे प्रकाशित केले.


- नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते त्या लेखकांची स्वतंत्र मते असून, त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
- सर्व प्रकारच्या हरकती, वादविवाद, मतभेद, हक्क, कायदेशीर कार्यवाही आदी बाबी मुंबई परिक्षेत्रातच उपस्थित करता येतील.



* स्थापित वर्ष १९२३ * नूतन नोंदणी वर्ष १९, अंक ३ *

# साईलीला


मे-जून २०१९

* संपादक
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

कार्यकारी संपादक *
विद्याधर मा. ताठे
एम.ए.(मराठी), बी. जर्नालिझम

## अंतरंग...







**संपादकीय** : विद्याधर ताठे ५
**श्री साईबाबांची शिकवण** : सौ. शैलजा राजीव रोहोम ७
**सर्व भूतमात्रांवर प्रेम करा!** : सौ. प्रियंवदा प्रकाश करंडे १२
**म. बसवेश्वर - क्रांतिकारी धर्मसुधारक** : विद्याधर मा. ताठे १३
**कर्मभक्तीचा त्रिवेणीसंगम** : सदाशिवसुत १८
**गुरुसेवेने परब्रह्माची उपासना** : प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे २३
**शिर्डी वृत्त** : जनसंपर्क विभाग २८
**साईसमाधीचे रामाच्या फोटोसह मंगल दर्शन** ३५

# संपादकीय



## विद्याधर ताठे - कार्यकारी संपादक

**यश, श्री, औदार्य, ज्ञान। शांती, वैराग्य हे षड्गुण।**
**इंहीं श्रीसाई भगवंत पूर्ण। ऐश्वर्यें संपूर्ण हरि जैसा।। - (४१/१७)**
**किती हो आमुचें भाग्य गहन। जेणें हा साई चैतन्यघन।**
**विनाअर्चन-पूजन-भजन। देई दर्शन आम्हांतें।। - (४१/१८)**

श्रीसाईलीला द्वैमासिक म्हणजे श्रीसाईंची वाङ्मयमूर्तीच आहे. साईभक्तीच्या-साईविचाराच्या प्रचार-प्रसारार्थ १९२३ साली रामनवमी उत्सवाच्या मुहूर्तावर शुभारंभ झालेल्या या नियतकालिकाने नुकत्याच झालेल्या रामनवमी उत्सवात ९६ वर्षे पूर्ण करून ९७व्या वर्षात पदार्पण केलेले आहे. अशा द्वैमासिकाचा कार्यकारी संपादक म्हणून श्रीसाई समाधी शताब्दी वर्षात सेवा करण्याची लाभलेली संधी हे मी माझे थोर भाग्य मानतो. श्रीसाईसच्चरितमधील वरील ओव्यांत हेमाडपंतांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याच आज हे संपादकीय लिहिताना दाटून आल्या आहेत. 'किती हो आमुचें भाग्य गहन, जेणें हा साई चैतन्यघन। विनाअर्चन-पूजन-भजन। देई दर्शन आम्हांतें।।' असाच अनुभव, अशीच प्रचिती हजारो साईभक्तांची असेल. म्हणूनच श्रीसाई समाधीस्थ होऊन १०० वर्षे झाली तरी त्यांच्याकडे हजारो साईभक्त आजही पूर्वीपेक्षा अधिक संख्येने येत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या श्रीरामनवमी उत्सवाचे सचित्र वर्णन आम्ही या अंकात सविस्तर दिलेले आहे. हे वृत्त वाचून व ऐकून, रामनवमी सोहळ्याचे शब्ददर्शन घेऊन साईभक्तीचे क्षितिज देशविदेशांत केव्हढे विस्तीर्ण होत आहे हेच दिसून येते. भारतात व विशेषतः महाराष्ट्रात संतांची मांदियाळीच होऊन गेली आहे पण श्रीसाईंची भक्ती प्रांताच्या, भाषेच्या, देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रापार पसरलेली आहे. या साईभक्तीने देशात-विदेशांत अनेक ठिकाणी अनेक प्रकारची समाजोपयोगी सेवाकार्य होत आहेत. साईभक्ती ही समाजसेवेची प्रेरणा शक्ती झालेली आहे.



प्रस्तुत मे-जूनच्या अंकामध्ये आम्ही 'साईंची शिकवण' नावाचे सलग दोन लेख दिलेले आहेत. साईभक्त सौ. रोहोमताई व साईभक्त सौ. करंडेताई या दोन महिलांचे लेख; हेमाडपंतकृत श्री साईसच्चरितमधील साईंच्या असंख्य लीलांमधून व्यक्त होणारा बोध अगदी सोप्या शब्दांत सांगतात. कोणाचे कष्ट फुकट घेऊ नका, कर्ज काढून सण साजरा करू नका, कोणाचाही द्वेष, मत्सर करू नका, समस्त प्राणीमात्रांवर प्रेम करा, विशेषतः मुक्या प्राण्याचा जीव जाणा, सत्याने, सदाचाराने वागा या साईबाबांच्या शिकवणीतील काही प्रमुख गोष्टी आहेत. त्या सर्व साईभक्तांनी आपल्या



आचरणात आणणे हीच खरी साईभक्ती होय! भक्ती म्हणजे केवळ पूजन-अर्चन हे कर्मकांड नव्हे तर श्रीसाईंच्या विविध लीलांपासून योग्य तो बोध घेऊन आचरण करणे होय!

'साईशिकवण'शिवाय या अंकात आम्ही अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने महात्मा बसवेश्वरांचा परिचय दिलेला आहे. महाराष्ट्रातील ज्ञानदेव-नामदेव या संतांच्या आधी १२व्या शतकात महात्मा बसवेश्वर हे महान संत, क्रांतिकारी, धर्मसुधारक होऊन गेले. म. बसवेश्वरांचे सर्व वचनसाहित्य कन्नड भाषेत असले तरी त्यांचे २४ वर्षे वास्तव्य आजच्या महाराष्ट्रातील पंढरपूरजवळील मंगळवेढा येथे होते. हे लक्षात घेता महाराष्ट्रसुद्धा त्यांची कर्मभूमी होती. म. गांधींसह देश-विदेशांतील विद्वान चिंतकांनी म. बसवेश्वरांच्या विचारांचा गौरव केलेला आहे. 'कायकवे कैलास' Work is Worship, 'श्रम हाच देव' हा संदेश म. बसवेश्वरांचा अक्षय्य बोध, उपदेश आहे. साईभक्त हेमाडपंतांनी श्री साईसच्चरितमध्ये अनेक संतांचा उल्लेख गौरवाने केलेला आहे. संत वेगवेगळे दिसले तरी त्यांच्या ठायीचा एकात्म भाव सारखाच आहे. कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे। हेच साईबाबांसह सर्व संतांच्या उपदेशांचे सार आहे.



जय साईराम !


- विद्याधर ताठे

कार्यकारी संपादक, साईलीला

भ्रमणध्वनी ९८८१९०९७७५

E-mail : vidyadhartathe@gmail.com


मागील मार्च-एप्रिल २०१९च्या अंकात पृष्ठ ५वरील संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांच्या 'साईसेवेचा महिमा अगाध!' या मनोगताच्या शेवटच्या परिच्छेदातील ४-५ ओळींतील इंग्रजी वाक्य ऐनवेळी उद्भवलेल्या मुद्रणदोषाने चुकीचे छापले गेले आहे. ते वाक्य **"The man who masters patience, masters everything"** असे आहे. त्या वाक्याशी संबंधित संलग्न ओळी अशा आहेत :- ...श्रद्धेची ताकद अफाट आहे. त्यासोबतच सबुरीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आज-काल लोकांना सर्व कसं इन्स्टंट पाहिजे. थांबायला वेळ नाही. आत्ताच्या आता पाहिजे. असे म्हणतात, **"The man who masters patience, masters everything".** म्हणून सबुरीला महत्त्व आहे. अशी ही बाबांची शिकवण त्रिकालाबाधित सत्य आहे...

चुकीबद्दल क्षमस्व - संपादकीय विभाग



श्री साईबाबांच्या लीला हीच त्यांची शिकवण आहे. कोणाचेही कष्ट फुकट घेऊ नयेत, कोणाची निंदा करू नये, याबरोबरच सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करा, कोणाचाही द्वेष, मत्सर करू नका, असे बाबांनी आपल्या कृतीतून शिकवलेले आहे.

## जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती।

# श्री साईबाबांची शिकवण (लेखांक १)

सौ. शैलजा राजीव रोहोम

**श्री** रामप्रभूंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दक्षिणगंगा गोदाकाठी पवित्र भूमीत साधारणतः १५० वर्षांपूर्वी साईबाबा प्रकटले. ज्या कालखंडात बाबा शिर्डीला आले त्यावेळी धर्माधर्मात निर्माण झालेली तेढ, उच्च-नीचतेचा, जातिभेदाचा अतिरेक इ. गोष्टी समाजात अगदी टोकाला गेलेल्या होत्या. जाती, धर्म, पंथ वर्ण यापलीकडे 'मनुष्यधर्म', 'मानवधर्म' हा सर्वश्रेष्ठ आहे, हे सर्वसामान्य जनतेला पटणे आवश्यक होते. हीच गोष्ट साईबाबांनी आपल्या बोलण्या-वागण्यातून, आचरणातून सर्वसामान्यांच्या मनात रुजविली. आजही संपूर्ण जगात धर्मावरून जो नरसंहार होतोय तो थांबविणे केवळ संतांची शिकवण अंगीकारूनच शक्य आहे.

**कैसे करावे आचरण मनुष्यधर्माचे पालन,**
**अगदी सोपे करून बाबा सांगती संवादे।**
**कैसे दैनंदिन प्रसंगातून बाबा देती सहज**
**शिकवण, कैसे बाबांचे वचनातून भक्तजन बोध घेती।**

साईबाबा कधी गहन वेदान्ताचे विवेचन किंवा उपनिषदावर प्रवचन देत नसत. त्यांचा उपदेश मुख्यतः नैतिक असे, सर्वसाधारण नीतीतत्वाचा असे. केवळ शाद्बिक बोधापेक्षा अनुभवातून, आचरणातून भक्तांना बोध होत असे. भक्तांची बुद्धी अथवा भूमिका त्यातून शुद्ध होई. साईबाबांची दिवसातून तीन वेळा द्वारकामाईत भक्तमंडळींसमवेत बैठक होत असे. बाबांच्या बोलण्यातून त्या त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या निरनिराळ्या मंडळींच्या मनात घोळत असलेल्या निरनिराळ्या बाबींसबंधी आपोआप खुलासे होत. अगदी साध्या-सोप्या भाषेत, अप्रत्यक्षरीत्या दुसऱ्याच कुणाची कथा बाबा सांगत असत. ती कथा ऐकून भक्तांच्या मनातील शंकेचे आपोआप निरसन होत असे.

**जोवरी नाही अनुभवजन्य ज्ञान।**
**तोवरी निरर्थक ग्रंथाचे वाचन।**
**करावे ग्रंथांचे वाचन, पारायण।**
**पण आचरणात आणल्याविना सारे व्यर्थ।**

विष्णुसहस्त्रनामाचे नित्य पठण, रामायणाचे पारायण करणाऱ्या रामदासीची विष्णुसहस्त्रनामाची पोथी बाबा माधवरावांना (शामाला) देतात. पोथी शामाला दिली, हे समजल्यावर भयंकर संतापून आकांडतांडव करणाऱ्या रामदासीला बाबा म्हणतात, '''असा कसा रे तू रामदासी, रोज अध्यात्म रामायण वाचतोस, विष्णुसहस्त्रनामाचे पारायण करतोस तरीही तुझे मन अशुद्धच.'' बाबा इथे हेच समजावत आहेत की, जे वाचता ते कृतीत आले पाहिजे. कुठलाही धर्मग्रंथ हिंसा सांगत नाही.

### देव भावाचा भुकेला

प्रेमाने वाहिलेले पान-फूल अथवा नमस्कार सद्गुरू करती स्वीकार अती प्रेमाने...

बाबांनी वेळोवेळी भक्तांना जाणीव करून दिली की, तुमच्या मनात परमेश्वराचा वास हवा. बाह्य उपचार, पूजा-अर्चा, अभिषेक-भंडारे याचा देव भुकेला नाही. दोन हात, तिसरे मस्तक पुरेसे आहे. दोन हात जोडून नतमस्तक व्हा, मनापासून ईश्वराला साद घाला. तो सदैव तुमच्याबरोबर आहे. अहंपणा सोडा, देव भावाचा भुकेला आहे. वांद्र्याला राहणाऱ्या तर्खडबाईंनी शिर्डीला जाणाऱ्या मुलाबरोबर घरात एकच शिल्लक उरलेला पेढा पाठविला. पेढा आणणारा बाबांना पेढा द्यायचाच विसरून गेला. परंतु बाबांनी 'आईने माझ्यासाठी काय दिले ते दे,' असे म्हणून पेढा मागून घेतला, जसे श्रीकृष्णाने सुदाम्याचे पोहे मागून खाल्ले.

### ज्योतिषाकडे जाऊ नका!

ज्योतिषी अथवा हस्तसामुद्रिकावर विश्वास ठेवून जन्मपत्रिका न बघता तुमचे कर्म तुम्ही करा, प्रयत्न करा, कष्ट करा. तुमचे भविष्य तुम्ही बदलू शकता, असे बाबांनी सांगितले. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तेंडुलकरांच्या मुलाला 'यंदा ग्रहबल नाही,' असे ज्योतिषाने सांगितले. बाबांना मुलाच्या आईकडून ते कळले. त्यावर 'भरपूर आभ्यास करा. स्वस्थ मनाने परीक्षेस बसा. यश नक्की मिळेल,' असा निरोप मुलाच्या आईजवळ बाबांनी दिला. त्यानुसार अभ्यास करून मुलगा परीक्षेत यशस्वी झाला. श्रद्धायुक्त मनाने काम केले तर संकटाचे निरसन होऊन यश प्राप्त होते.

### कल्पांतीही न भेटे देव जीव तृप्त असल्याविना

अन्न हे पूर्णब्रह्म आहे. अन्न आणि अन्न खाणारा ही दोन्ही श्रीविष्णूंची रूपे आहेत. मग निराहार-निर्लेप-निर्जल उपवासाची आवश्यकता काय? 'नको वृथा क्लेष जिवात्म्याला.' बाबा स्वतः उपाशी राहात नसत व इतरांनाही उपाशी राहू देत नसत. आत्मा आधी तृप्त करा. उपास केल्याने ना आत्मा संतुष्ट होतो, न चित्त स्वस्थ राहाते, शांत राहाते. जर तुमचे चित्त शांत नसेल तर ईश्वरभजनात ते गुंतेलच कसे? भुकेची वेळ झाल्यावर वेळेवर अन्न पोटात गेले नाही तर मनुष्य कासावीस होतो. चित्त थाऱ्यावर राहात नाही. मग

कुठल्याही गोष्टीत, मग ते परमेश्वराचे भजन-कीर्तन असो, मन एकाग्र होत नाही, रमत नाही.

### वाढले ताट डावलू नये

उपवास करणाऱ्या गोखलेबाईंना उद्देशून बाबा ब्रह्म शोधणाऱ्या चौघांची गोष्ट सांगतात. वणजाऱ्याने भाकरतुकडा खा म्हणता, तिघे त्याकडे दुर्लक्ष करतात आणि उपाशी पोटी पुढे वनात जातात. मात्र बाबा त्याने दिलेली भाकरी खातात आणि भाकरी खाताच बाबांना गुरुमहाराजांचे दर्शन होते आणि ब्रह्मज्ञानाचा ठेवा प्राप्त होतो.

### काढुनिया ऋण नका करू सण

रामलाल पंजाबी पैसे उसने घेऊन शिर्डीला बाबांच्या दर्शनाला आला ही गोष्ट साईबाबांना आवडली नाही. तसेच ज्या ज्यावेळी द्वारकामाईत हंडीचा कार्यक्रम होई त्या त्यावेळी बाबा ठरवून, पारखून रोख पैसे देऊन माल खरेदी करत असत. उधारीची बातच नसे.

**विंचू साप झाले तरी सर्वत्र नांदतो हरी,**
**प्रेम करावे त्यांचेवरी।**
**वाचवणारा आहे हरी, मनी धरावी 'सबुरी'**
**दया करावी प्राण्यांवरी।**

गीतेत भगवान श्रीकृष्ण सांगतात - 'माझा अंश प्रत्येक जीवात आहे.' बाबांनीही प्रत्येक वेळी हेच सांगण्याचा प्रयत्न केला की, 'भुकेल्याला अन्न द्या, त्याचा आत्मा तृप्त करा, ते माझ्यापर्यंत पोहोचते.' तर्खडांच्या पत्नीला असाच एकदा अनुभव आला. सहज भुकेल्या कुत्र्याला भाकरतुकडा घातला. गोष्ट अगदी सहज घडली. बाई विसरून गेल्या, पण द्वारकामाईत गेल्यावर बाबांनी ही गोष्ट स्वतःहून काढली व म्हणाले, 'आज अगदी तृप्त झालो.' प्रत्येक प्राणीमात्र आपल्या स्वभावधर्मानुसार वागतो. बाबा म्हणत - 'विंचवाचा धर्म नांगी मारणे, पण माणसाचा धर्म क्षमा करणे.' परमेश्वराचा वास सर्व प्राणीमात्रांत आहे, हे पक्के केले की



आपोआप मनुष्याचे आचरण शुद्ध होते.

### निंदा करू नये

**बहुत सुकृताने प्राप्त मानवजन्म,**
**निंदा करूनी का घालवी व्यर्थ।**

बाबा म्हणत - 'जो जैसा करील, तो तैसा भरील।' एखाद्याचे निंदनीय वर्तन असेल तर त्याच्यासमोरच ते सांगावे, त्याला समजवावे. परंतु त्याची पाठीमागे निंदा करू नये. एकदा इतरांची निंदा-कुचेष्टा करणाऱ्या एकाला ऐकवण्याकरता बाबा म्हणतात - 'बघा, त्या डुकराला काय लागते गोड, का आत्मजनावरची त्याची चडफड.' बाबा म्हणत - **'नका काढू कुणाचे उणे दुणे। त्याने मज येते दुखणे।'** कुणाला जिव्हारी लागेल असे बोलू नये. शब्दांचा वार हा शस्त्रापेक्षाही खोलवर जखमा करतो. कुणाला कमी लेखणे, अपमान करणे या गोष्टी बाबांना आवडत नसत. पशुपक्षी, मनुष्यप्राणी, कुणाचाही तिरस्कार करू नये. राग करू नये. कुणाला मदत करायची नसेल तर करू नका, काही द्यायचे नसेल तर देऊ नका; पण वाईट बोलून, ओरडून त्याचा अपमान करू नका. एखादा वाईट बोलला तर ऐकून घ्यावे, उलट वाईट उत्तर देऊ नका. काहीतरी ऋणानुबंध असतात म्हणून माणसं आपल्या आयुष्यात येत असतात. कुणी अपकारी

भेटला तरी आपण उपकारच करावेत. फळाची अपेक्षा न करता कर्म करावे.

**'श्रद्धा' नी 'सबुरी'चे महत्त्व**

हेमाडपंतांना देशमुखबाईंची कथा सांगून बाबांनी हेच दाखवून दिले की, गुरुठायी श्रद्धा असावी, विश्वास असावा. गुरु कर्ता, गुरु हर्ता, गुरुच केवळ त्राता, हा भाव मनात पाहिजे. प्रेमदृष्टीने कासवी पिलांचे रक्षण करते तशीच सद्‌गुरूंची भक्तांवर कृपादृष्टी असते. त्यासाठी 'सबुरी' असणे आवश्यक आहे. 'धीर धरा रे, धिरापोटी फळे रसाळ गोमटी.' बाबांनी सांगितले, गुरूंची कृपा व्हावी म्हणून १२ वर्षे रात्रंदिन मी गुरूंची सेवा केली.

**श्रमाचे महत्त्व**

बाबा आपल्या आचरणातून दाखवून देत असत. बाबा स्वतः आपला लंगोट, कफनी शिवत असत. मशीद झाडत. जात्यावर गहू दळीत. हंडीच्या कार्यक्रमासाठी स्वतः वाण्याकडे जाऊन भाव ठरवून सामान आणीत. पुलाव भात, आंबील इ. पदार्थ स्वतः पाट्यावर वाटून करीत आणि भक्तांना स्वतः खाऊ घालीत.

**श्रमाचा मोबदला**

श्रमाचा मोबदला कृतज्ञता भावाने द्यावा, हमाली म्हणून देऊ नये. कुणाचे श्रम फुकट घेऊ नयेत. त्याचा योग्य तो मोबदला द्यावा. एकदा राधाकृष्णाबाईंच्या छपरावर शिडी लावून बाबा वर चढून खाली उतरले आणि उतरताक्षणी शिडीवाल्याला दोन रुपये मोजून दिले. याबाबत विचारता बाबा म्हणाले, 'आठवण ठेवून श्रमाचा मोबदला द्यावा. फुकटचे श्रम आणि श्रमाचा भार माथी घेऊ नये.'

**समानता**

**कुणी उच्च-नीच नाही**
**सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहेत।**

परमेश्वर सर्वव्यापी आहे. जसा तो मालकात




आहे तसा तो नोकरातही आहे. रंकात आहे, रावातही आहे. मोकरणीतही आहे. मोलकरणीसह हे ब्रह्म मी व्यापलेले आहे, हे दासगणूंना बाबांनी दाखवून दिले. उपनिषदाची उकल, दासगणूंना पडलेले ईशावास्याचे कोडे, एक छोटीशी अडाणी, कुणब्याची पोर, काकांची मोलकरीण सोडवते. बाबांना हे स्वतः दासगणूंना सांगता आले असते, परंतु या प्रसंगातून बाबांना हे महान तत्व सांगायचे होते की, मोलकरणीसह मी ब्रह्म व्यापून आहे. जगात भिन्न-भिन्न प्राणी दिसत असले तरी सर्वांमध्ये माझा वास आहे. सर्वांत आत्मा एकच आहे. मी श्रेष्ठ, मी कनिष्ठ, मी, माझा हा अभिमान धरू नये. एकात्मभाव मनामध्ये सदैव धरावा.

**जोपर्यंत लोभ, मोह सुटत नाहीत तोपर्यंत ब्रह्मज्ञान होत नाही**

द्रव्याचा, धनाचा, संपत्तीचा हव्यास सुटेल, विकारांचा, विषयांचा संग सुटेल, लोभाचे उच्चाटन होईल, अहंपणा गळून जाईल त्यावेळी ब्रह्मज्ञान होईल. 'सच्चिदानंदस्वरूप' प्राप्त होईल. अज्ञानाचा अंधःकार नष्ट होईल तेव्हा ज्ञान प्राप्ती होईल. एका ब्रह्मजिज्ञासूला ब्रह्मप्राप्तीसाठी आधी लोभ, मोह यापासून मनुष्य मुक्त पाहिजे, हे बाबांनी त्याच्याच उदाहरणातून दाखवून दिले. त्याच्यासमोर बाबा थोडा वेळ ५ रु. उधार, उसने मिळण्यासाठी एकाला चार ठिकाणी पाठवतात. परंतु

खिशात २५० रु. असतानाही ब्रह्मज्ञानाची इच्छा करणारा थोड्या वेळासाठीही बाबांना ५ रु. उसने देत नाही. हा धनलोभ जोपर्यंत सुटत नाही, विरक्ती येत नाही तोपर्यंत संसारातून मुक्ती मिळत नाही. मग ब्रह्मज्ञान कसे होणार?

**उदीमाहात्म्य**

साईबाबा येणाऱ्या प्रत्येकाला 'उदी' देत असत. 'उदी' हे नश्वर देहाचे प्रतीक आहे. या देहाचा वृथा अभिमान नको. मातीच अंतिम सत्य आहे. हे जग, बाकी सारे माया आहे.



**सबका मालिक एक**

बाबा सदैव म्हणत – 'सबका मालिक एक.' आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत. मग त्या अंतिम सत्याला कोणी अल्ला म्हणो, ईश्वर म्हणो, राम म्हणो, कृष्ण म्हणो. अतिशय सोवळे-ओवळे पाळणाऱ्या कर्मठ मुळ्यांना आरतीच्या वेळी साक्षात् त्यांच्या गुरूंचे, घोलपस्वामींचे बाबांच्या जागी दर्शन झाले. आपला उच्च वर्ण, सोवळे-ओवळे हे सर्व विसरून गुरुचरणी मुळे तल्लीन झाले. तसेच, साईंना वंदन करण्यासाठी नकार देणाऱ्या एक डॉक्टरांना साईंच्या जागेवर साक्षात् सीतापती श्रीराम दिसल्यावर त्यांनी साईचरणांवर लोटांगण घातले. रामदासीच्या पत्नीला प्रत्यक्ष धनुर्धारी, शामल श्रीरामरूपात दर्शन दिले. या सर्व प्रसंगांतून एकच शिकवण मिळते, अंतिम सत्य एक आहे. परमेश्वर एकच आहे. आज जगात धर्माधर्मात निर्माण झालेली दरी जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे घेऊन जात आहे. बाबांची शिकवण आज प्रत्येकाने अंगीकारणे आवश्यक आहे. सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, हे एकदा मान्य केल्यावर धर्माच्या श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचा प्रश्नच येत नाही.

* प्रत्येक धर्म हेच सांगतो की, माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे. धर्म म्हणजे माणसाने आखलेली आचरणाची पद्धत आहे.

* अहंपणाचा त्याग केला, लोभ, मोह सोडला की आपोआप माणसा-माणसातील वैरभाव नष्ट होईल. सत्ता आणि धन यासाठी होणारी चढाओढ, भांडणे, युद्ध यांची आवश्यकता उरणार नाही.

* 'विवेकपूर्ण वैराग्य' हे उदीचे महासारतत्व प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे.

पाण्याला जसे नीर म्हणा, तोय वा जल म्हणा, वॉटर म्हणा, पाणी पाणीच असते, तसे परमेश्वराला कोणत्याही नावाने हाक मारली तरी तो एकच आहे. म्हणूनच मशिदीला बाबा द्वारकामाईही म्हणत असत. मशिदीत घंटानाद होई, बाबांची आरती होई आणि कुराणातली कलमेही पढली जात. जेवताना फात्या दिला जाई. रामनवमीला मंदिरावर निशाणेही लावली जातात आणि चादरही चढवली जाते. प्रत्येक धर्मियाला बाबा आपले वाटतात. हीच बाबांची शिकवण जगाला 'कल्याणकारी' ठरेल आणि 'विश्वबंधुत्वाची' भावना प्रत्येकात निर्माण होईल, प्रेम निर्माण होईल.

**नको उच्च-नीच, नको जातिभेद।**
**'सबका मालिक एक' साई म्हणे।।**

**सौ. शैलजा राजीव रोहोम**
**मो. ९४२१८०९२५८**

# सर्व भूतमात्रांवर प्रेम करा!

(लेखांक २)

शालेय शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण आपल्याला उपजीविकेसाठी उपयुक्त असते. परंतु सद्गुरूंनी दिलेले अनुभूतीपूर्ण ज्ञान आपल्या मनुष्यजन्माचे सार्थक करते. आपले अज्ञान दूर करून गुरू आयुष्याचा खरा अर्थ, खरे प्रयोजन काय आहे, याची जाणीव आपल्याला आध्यात्मिक अभ्यासाद्वारे करून देतात. आपण सर्वजण आयुष्यभर सुखप्राप्तीसाठी झटत असतो. परंतु खरे सुख नेमके काय आहे, हे आपणाला समजलेले नसते. अमाप संपत्तीने मनुष्य सुखी झाला असता तर श्रीमंतांनी आत्महत्या केल्याची उदाहरणे का दिसतात? विद्वान, सुशिक्षित मंडळी निरनिराळ्या गुन्ह्यांत अडकून तुरुंगात शिक्षा का भोगतात? खरे शिक्षण म्हणजे नक्की काय? तर जे शिक्षण तुमचे मन, बुद्धी स्थिर करते, तुम्हाला चांगले वागण्यासाठी मार्गदर्शन करते, वाईट कर्म करण्यापासून तुम्हाला दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करते, थोडक्यात तुमच्या आत्म्याचा विकास करून तुम्हाला शाश्वत सुखाची प्राप्ती करून देते ते होय!



सद्गुरू साईनाथांची दिव्य शिकवण म्हणूनच प्रत्येकासाठी स्वतःचा उद्धार करून घेण्यासाठी व जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होण्यासाठी अत्यंत अमूल्य आहे. शिकवण किती साधी-सोपी आहे!

साईबाबांनी सांगितले आहे, **सर्व भूतमात्रांवर प्रेम करा**! यामुळे आपलाच फायदा होईल. दुसऱ्यांकडून आपल्याला शुभेच्छा मिळतील.

आपण कुणाचा द्वेष, मत्सर करू नये. याचे कारण आपणच दुःखी होऊ. दुसरा कोणी जास्त धनवान झाला, प्रसिद्धीस आला, तर आपण मत्सर केल्याने काय होणार, तर आपणच दुःखी होणार. आपली प्रगती खुंटणार. आपल्याला विनाशाकडे नेणारा मत्सर हा आपला फार मोठा शत्रू आहे. म्हणूनच कुणाची बरोबरी न करता आपल्या कुवतीनुसार प्रामाणिकपणे प्रयत्न करत आपली प्रगती साधणे हा जीवन सुखाने व शांततेने जगण्याचा सोपा मार्ग आहे.

परनिंदा करणे हे पाप आहे, आपल्याला अधोगतीकडे नेणारा दुर्गुण आहे. आपल्या मुखाने भगवंताचे नामस्मरण करावे, कुणाची निंदा करून त्याच्यावर टीका केल्याने आपण मोठे होत नसतो. उलट आपले मुख अशुद्ध होते. जाणीवपूर्वक वाईट बोलणे टाळले तर सरस्वतीमाता प्रसन्न होऊ शकते. वाणी हे समाजात आपले परस्परसंबंध हितकारक राखण्याचे प्रभावी माध्यम आहे. वाणीत अलौकिक शक्ती आहे. जितके आपण चांगले आणि सकारात्मक बोलू तितके आपल्या वाणीत, आपले बोलणे प्रत्यक्षात अनुभवास येण्याचे सामर्थ्य येते. सद्गुरू साईनाथ म्हणूनच वाणीच्या शुचितेची महती सांगतात. आपण कुणाला टाकून बोललो, वाईट बोलून त्याचे मन दुखावले तर साईनाथांना त्याचा त्रास होतो.

आपण कष्ट करून, मेहनत करून आपले जीवन चांगल्या रीतीने जगणे म्हणजे साईनाथांना आनंद देणे होय! दुसऱ्याच्या धनावर डोळा ठेवू नये. परमेश्वरावर आपण पूर्ण विश्वास ठेवून, त्याच्यावर आपला भार टाकून आपली नियतकर्मे सचोटीने करावीत. सर्वांमध्ये ईश्वराचा अंश आहे, याची पक्की जाणीव ठेवावी. आपण जशी कर्मे करू तशीच आपणास फलप्राप्ती होणार. तेव्हा, उत्तम कर्मे करून, परोपकार करून, सद्गुरूंची शिकवण आचरणात आणून आनंदाने जीवन जगावे. तरच इतका दुर्मिळ असा मिळालेला मनुष्यजन्म सार्थकी लागेल. स्वतःजवळ कर्तेपण न ठेवता मानवसेवा करून स्वतःचे कल्याण साधावे. शेवटचा दिवस अमृतासारखा गोड होईल! कारण जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मोक्ष मिळवून देणे सद्गुरूंनाच शक्य आहे. म्हणूनच गुरुकृपा हवी! हेच सत्य आहे.

**सौ. प्रियंवदा प्रकाश करंडे**



# म. बसवेश्वर - क्रांतिकारी धर्मसुधारक

विद्याधर मा. ताठे
(कार्यकारी संपादक, ‘साईलीला’) एम.ए., बी.जर्नालिझम

**म. बसवेश्वरांच्या अवतारसमाप्तीला आता ९०० वर्षे झाली आहेत, तरीपण आजही त्यांचे विचार समाजसुधारकांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. म. बसवेश्वरांच्या जीवनातील २४ वर्षांचा सुवर्णकाळ हा महाराष्ट्रातील मंगळवेढ्यात गेला आहे, हे लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने मंगळवेढा येथे त्यांचे भव्य-दिव्य राष्ट्रीय प्रेरणास्मारक निर्माण करावे. महात्मा बसवेश्वरांच्या महाराष्ट्रातील वास्तव्याचा प्रत्येक महाराष्ट्रीयाने अभिमान बाळगून संत ज्ञानोबा-तुकोबांएवढेच म. बसवेश्वर यांनाही आपल्या संतपरंपरेत स्थान द्यावे. ‘बसववचन’ साहित्याचाही आपल्या संतसाहित्यात अभ्यास केला जावा.**

**ज्या** साधूसंतांनी समाजाच्या एकतेसाठी आपले आयुष्य वेचले त्या संतांना आपल्या राजकारणी समाजाने जाती, संप्रदाय, प्रदेश आणि भाषा यामध्ये वाटणी करून संतांच्या उदात्त, व्यापक माणुसकी धर्मालाच हरताळ फासला आहे. समाजाचे कल्याण, सुख हेच संतांच्या कार्याचे अंतिम उद्दिष्ट आहे. **'बुडते हे जन न देखवे डोळा।'** किंवा **'जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।'** हे सकल संतांच्या कार्याचे अधिष्ठान आहे. आपल्या देशाला संतांची फार मोठी वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. त्यांचे कार्य हे माणसाच्या शाश्वत सुखासाठीच असल्याने ते अजरामर आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण हे सदैव प्रेरणादायी आहे.

## मंगळवेढा बसवेश्वरांची कर्मभूमी

इ. स. ११०५ मध्ये अक्षय्य तृतीयेच्या दिनी म. बसवेश्वर यांचा जन्म झाला, असे मत आहे. काही अभ्यासक हे जन्मसाल ११३१ मानतात. त्यांचा जन्म विजापूर जिल्ह्यातील 'बागेवाडी'चा. (सध्या त्या गावाला बसवबागेवाडी म्हणून ओळखले जाते.) पण त्यांची कर्मभूमी होती सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरजवळील मंगळवेढा. **बसवेश्वर यांच्या आयुष्यातील महत्त्वाची २४ वर्षे त्यांनी मंगळवेढा येथेच घालवली.** येथेच त्यांना प्रथम बिज्जल राजाच्या पदरी कार्मिक म्हणून नोकरी मिळाली. येथेच त्यांचे मामाच्या मुलीशी लग्न झाले आणि येथेच ते 'कोषाध्यक्ष' म्हणून राजदरबारातील एक प्रमुख मानकरी झाले. अशा प्रकारे महाराष्ट्रातील मंगळवेढ्याचे म. बसवेश्वरांच्या एकूण जीवनात विशेष महत्त्व आहे. पुढे राजधानी मंगळवेढ्याहून कर्नाटकातील बिदरजवळच्या 'कल्याण' येथे स्थलांतरित झाल्यावर म. बसवेश्वरांना मंगळवेढा सोडून कल्याणला जावे लागले. पण कल्याण येथे 'अनुभवमंटप' व जे काही अन्य कार्य त्यांनी केले त्यांचे सारे चिंतन-मनन त्यांच्या मंगळवेढ्यातील वास्तव्यातच झाले होते. **म. बसवेश्वरांचे महाराष्ट्राशी असे २४ वर्षांचे हृद्य संबंध आहेत.** त्यामुळेच कर्नाटकप्रमाणे अक्षय्य तृतीयेला म. बसवेश्वर जयंती महाराष्ट्रात शासनाद्वारे साजरी केली जाते. पण खरे तर मंगळवेढा येथे म. बसवेश्वरांचे महाराष्ट्र शासनाने भव्य-दिव्य असे राष्ट्रीय स्मारक उभे करण्याची गरज आहे. या दृष्टीने काही प्रयत्न सुरू झाले आहेत, ते स्वागतार्ह आहेत, पण त्याची गती वाढून लवकरात लवकर राष्ट्रीय स्मारक होणे हे महाराष्ट्रालाच भूषणावह ठरणार आहे.

म. बसवेश्वर १२व्या शतकात झालेली महान विभूती आहे. आज २१व्या शतकात ९०० वर्षे झाली तरी म. बसवेश्वरांनी केलेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणा खूपच पुरोगामी होत्या असे वाटावे, इतका आपला समाज परंपराग्रस्त व प्रतिगामी आहे. आजही आपल्या समाजात अनेक ठिकाणी स्त्री-पुरुष भेदाभेद आहेत. कायदे अनेक झाले, पण समाजातील लिंगभेद गेलेला नाही. अजूनही स्त्रीभ्रूणहत्या होत आहे, अजूनही 'सैराट' चित्रपटात दर्शविला तसा जातिभेद, उच्च-नीच भेदभाव ग्रामीण भारतात मोठ्या प्रमाणावर आहे. या सर्व पार्श्वभूमीवर म. बसवेश्वरांनी समता, बंधुता आणि स्त्री-पुरुषसमानता या तत्वावर आधारित केलेले कार्य खरोखरच क्रांतिकार्य आहे. **म्हणूनच जगातील विचारवंत म. बसवेश्वरांना आद्य साम्यवादी मानतात. तसेच अनेक समाजसुधारक म. बसवेश्वरांना आद्य समाजसुधारकाचा मान देतात. महात्मा गांधी, विनोबा भावे, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यासह जगातील अनेक थोर विचारवंतांनी म. बसवेश्वरांच्या कार्याचा मुक्त कंठाने गौरव केलेला आहे.** आपल्या संसदेच्या प्रांगणात त्यामुळेच म. बसवेश्वरांच्या पुतळ्यास यथोचित स्थान देण्यात आलेले असून

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते गेल्या वर्षी लंडनमध्ये म. बसवेश्वरांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले, या गोष्टी आजही म. बसवेश्वर कसे प्रेरणादायी आहेत याचेच दर्शन आहे.

## वचनसाहित्य बसवेश्वरांची वाङ्मयमूर्ती

मराठी साहित्यात संत निवृत्तीनाथ ते संत तुकडोजी महाराज यांच्या अभंगसाहित्याचे फार मोठे योगदान आहे. संतसाहित्य हे मराठी साहित्याचे ओज व तेज आहे. तसेच कर्नाटकातील कन्नड साहित्यामध्ये महात्मा बसवेश्वर व त्यांच्या अनुयायांच्या **'वचनगळू'**साहित्याचे अपूर्व योगदान आहे. **म. बसवेश्वरांची वचने ज्ञानाधिष्ठित भक्तीचा रोखठोक शब्दाविष्कार आहे.** तत्कालीन समाजातील अंधश्रध्दा, कुप्रथा, अज्ञ कर्मकांड, दांभिकता, भेदाभेद यावर म. बसवेश्वरांनी वचनसाहित्यातून जे कोरडे ओढले आहेत ते आजच्या काळातही थक्क करणारे आहेत. वीरशैव लिंगायत विचारधारेत २८ आगम आणि २०५ उपागमांना जे स्थान आहे तेच, किंबहुना काहीसे अधिक स्थान म. बसवेश्वरांच्या वचनसाहित्याला आहे. **कन्नड भाषेतील वचनसाहित्य ही म. बसवेश्वरांची वाङ्मयमूर्तीच आहे.** भगवद्**'गीता'** ही भगवान श्रीकृष्णांची, **ज्ञानेश्वरी** संत ज्ञानेश्वरांची, **अभंगगाथा** संत तुकोबांची, **दासबोध-आत्माराम** संत रामदास यांची वाङ्मयमूर्ती आहे असे म्हटले जाते. तद्वतच वचनसाहित्य संत बसवेश्वरांची वाङ्मयमूर्ती आहे. त्या वचनांपासून आपण बोध घेऊन त्या मार्गावर आचरणाने वाटचाल केली पाहिजे. अशी कृतीरूप भक्तीच म. बसवेश्वरांची खरी पूजा - पुण्यस्मरण ठरेल.

## कर्मसंस्कृतीचा पुरस्कार

भारतीय प्राचीन विचारधारेमध्ये 'धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष' असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. धर्माधिष्ठित अर्थार्जन व कामजीवनाला भारतीय चिंतकांनी पुरुषार्थाचे स्थान दिले असून अशा अर्थ व कामातून मोक्षप्राप्तीचा चौथा पुरुषार्थ सहजपणे साध्य होतो. पण कालप्रवाहात हा पुरुषार्थविचार क्षीण होत गेला व कर्मसंन्यासी - निवृत्तीमार्गी विचारधारा बळावत गेली. आपले विहित कर्म सोडून लोक भलत्याच कर्मकांडात-पूजापाठात धन्यता मानू लागले. समाज ऐदी, आळशी होत गेला. अशा मरगळलेल्या-दिशाहीन समाजाला १२व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी **'कायकवे कैलास'** work is worship - कर्माद्वारेच कैलासप्राप्तीचा कर्मयोगी बोध केला. **दैवाधिन समाजात कर्मसंस्कृतीचा जागर केला व सारे वातावरण कर्मसंस्कृतीच्या पुरस्काराने भारून टाकले.** म. बसवेश्वरांची दीक्षा स्वीकारणाऱ्या प्रत्येक शिवशरणाने स्वकष्टार्जित धन मिळवूनच उदरनिर्वाह केला पाहिजे असा म. बसवेश्वरांचा दंडक होता. अनुभवमंटपात जमा झालेल्या देशाच्या विविध प्रांतांतील, विविध जातींच्या-वर्णांच्या शिवशरणांना दैनंदिन काम केल्यानंतरच अनुभवमंटपातील धार्मिक तत्वचर्चेत सहभागी होता येत असे. या शरणांमध्ये सावकार होते, राजे होते, पण आता ते केवळ बसवदीक्षित शिवशरण होते. हे शिवशरण आपले राजेपण-श्रीमंती विसरून दैनंदिन कष्टाचे काम करण्यात धन्यता मानत होते, हा बसवेश्वरांच्या नवविचारांचा क्रांतिकारी परिणाम होता. या दृष्टीने बसवेश्वरांच्या वचनांतील पुढील वचन पहा -

**ज्याने आपल्या घामाने**
**काळी माती भिजवली**
**ज्याने तन-मन श्रमपूर्वक झिजवले**
**ज्याने स्वतःच्या श्रमाने शिवाची पूजा केली**
**ज्याने गरिबांच्या झोपडीला कैलास मानले**

**असा वाणी व करणीने एक असलेलाच**
**हे कुडलसंगमदेवा! जगदवंद्य होतो.**

या वचनातील श्रमसंस्कृतीचा पुरस्कार व प्रतिपादन हेच म. बसवेश्वरांच्या कार्याचे विशेषत्व होते. आणि केवळ श्रम-कष्टच नव्हे तर शुध्द आचरण व सदाचार यावरही म. बसवेश्वरांचा भर होता.

## म. बसवेश्वर व संत ज्ञानेश्वर

म. बसवेश्वरांच्या समाधीनंतर सुमारे १३९ वर्षांनी महाराष्ट्रात संत ज्ञानदेवांचा जन्म झाला. संत ज्ञानेश्वरांची मुख्य पुण्यभूमी, कर्मभूमी श्रीक्षेत्र **पंढरपूर** आणि म. बसवेश्वरांची २४ वर्षे कर्मभूमी राहिलेले **मंगळवेढा**, या दोन क्षेत्रांमध्ये केवळ १५ कि.मी. अंतर आहे. संत ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील संतमंडळींतील संत चोखामेळा हेसुध्दा मंगळवेढ्याचेच होते. संत ज्ञानदेवांच्या अभंगगाथेमध्ये एक अभंग कन्नडमध्ये आहे हे अनेक अभ्यासकांकडून दुर्लक्षित झाले आहे. तो कन्नड अभंग पुढीलप्रमाणे आहे -

**आभानिकेळे चिकनामातु।**
**कोरुळे धनिगे मरुळादेने।।१।।**
**चलुवाने चलुवाने पंढरीराया चलुवाने।**
**यल्ले दोरकन्ने गल्ले बारन्ने।।२।।**
**पुंडलिकने भक्तिगे बंदा।**
**रखुमा देविवरु विठ्ठलने।।३।।**

ज्या अर्थी ज्ञानदेवांनी कन्नडमध्ये अभंग लिहिला आहे त्या अर्थी त्यांना कन्नड भाषाही अवगत असावी असे म्हणता येते. आणि त्यामुळे महात्मा बसवेश्वरांचे कन्नड वचनसाहित्य ज्ञानेश्वरांच्या वाचनात आले असावे. महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतिकार्याचा सुखान्त होण्याऐवजी शोकान्त झाला. याचा अनेकांना धक्का बसला. तर परंपरावाद्यांना आनंद झाला. बसवेश्वरांना राजाज्ञेने अखेर कल्याण सोडावे लागले. प्रचंड हिंसाचाराने समाजात सुधारणांविषयी भीती निर्माण झाली. **म. बसवेश्वरांचे कार्य समग्र क्रांतीचे होते. त्यातील सामाजिक क्रांती पचवण्यास समाज अजून तयार नव्हता, त्यामुळे त्या कार्याचा शेवट हिंसाचारात झाला. यापासून महाराष्ट्रातील ज्ञानेश्वरादी संतांनी बोध घेऊन आपल्या कार्याला पारमार्थिक क्षेत्रापुरतेच सीमित केले व पारमार्थिक समतेचा पुरस्कार केला असावा.** पंढरीच्या वाळवंटात अठरापगड जातीच्या विठ्ठलभक्तांना संत ज्ञानदेव-नामदेव एक करतात. **'कुळजातीवर्ण। येथ आघवेचि अकारण।'** असे पारमार्थिक क्षेत्रात संत ज्ञानदेव कुळ, जाती, वर्ण अकारण असल्याचे प्रतिपादन करतात, पण सामाजिक संदर्भात ते **'मार्गाधारे वर्तावे।'** म्हणत तत्कालीन वर्णव्यवस्थेला दुजोरा देतात. या तडजोडीमागे ज्ञानेश्वरांनी बसवक्रांतीपासून घेतलेला बोध असू शकतो. वीरशैव साहित्याचे साक्षेपी अधिकारी सोलापूरचे **डॉ. शे. दे. पसारकर** म्हणतात - **''तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी जी पारमार्थिक समतेची चळवळ उभारली त्यावेळी त्यांच्यासमोर मला निश्चितपणे वाटते की, महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतीचे यशापयश होते.''** महाराष्ट्रातील संतपरंपरेमध्ये संत ज्ञानदेवांना **'ज्ञानदेवे रचिला पाया'** असा आद्यत्वाचा मान दिला जातो. मला वाटते, संत ज्ञानदेवांच्या अपूर्व कार्यात म. बसवेश्वरांच्या कार्याचा बोध अनुस्यूत आहे. संत ज्ञानदेवांच्या गाथेमध्ये केवळ एक अभंग कन्नडमध्ये उपलब्ध आहे. कदाचित त्यांचे आणखी काही कन्नड अभंगही असावेत. त्याचा शोध घेतल्यास त्यायोगे महात्मा बसवेश्वर व संत ज्ञानेश्वर यांच्यातील अनुबंध अधिक नेमकेपणाने समोर येतील.

## समारोप

म. बसवेश्वर हे संतांचे संत, सुधारकांचे



सुधारक असे एक पाऊल पुढे होते. त्यांच्या क्रांतिकार्याचा देश-विदेशांतील चिंतकांनी - सुधारकांनी गौरव केलेला आहे. थोर साक्षात्कारी संत गुरुदेव रानडे हे मराठी परिवारातील होते; पण त्यांची मातृभाषा कन्नड होती. असे **थोर साक्षात्कारी गुरुदेव रानडे** म. बसवेश्वर यांचा गौरव करताना म्हणतात - **''म. बसवेश्वर एक महान मानवतावादी तत्त्वज्ञ होते. ते सॉक्रेटीस, प्लेटो, फिडो, सेंट पॉल आणि किंग मार्टिन ल्यूथर यांच्या पंक्तीत बसण्याचा मान प्राप्त करण्याएवढे महान होते.''**

म. बसवेश्वरांना अनेकजण वीरशैव धर्म संस्थापक म्हणतात, पण ती वस्तुस्थिती नव्हे, वीरशैव धर्ममत हिंदू धर्माएवढेच प्राचीन आहे. त्यामध्ये कालसापेक्ष काही स्थितीस्थापकत्व आले होते, ते म. बसवेश्वर यांनी दूर केले व प्राचीन धर्मालाच नवे स्वरूप देऊन नवी मांडणी केली आहे. वीरशैव धर्मातील आगम व दर्शने ही बसवेश्वरपूर्व काळातील आहेत. काही अभ्यासक 'लिंगायत' व 'वीरशैव' यातही भेद करतात व 'लिंगायत धर्म बसवाचा' आणि 'वीरशैव धर्म पंचाचार्यांचा' असा चुकीचा भेद करतात. खरं तर वीरशैव धर्माचा **लिंगार्चना** हा एक मुख्य आचार आहे. म्हणूनच प्रत्येक वीरशैव गळ्यात लिंग धारण करतो. या **लिंगधारण व लिंगार्चना**च्या आचारामुळे वीरशैवांनाच लिंगायत म्हटले जाते असे विद्यमान काशी जगद्गुरूंचे मत आहे. अर्थात् हा एक वादाचा विषय काहींनी केलेला आहे, पण सुज्ञांनी तथ्य समजून घ्यावे. सांगण्याचा मुद्दा एवढाच की **महात्मा बसवेश्वर हे वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक नसून प्रभावी प्रचारक-धर्मसुधारक-प्रवर्तक आहेत.**

वारकरी संप्रदाय संत ज्ञानेश्वरांपूर्वीही होता, तरी ज्ञानदेवांनी पाया रचला असे म्हणतात. वर्धमान महावीरांपूर्वी जैन धर्म होता व २३ तीर्थंकर झाले होते, तरी २४वे तीर्थंकर महावीरांना जैन धर्माचे संस्थापक म्हणतात. तसेच कोणी आदराने-श्रध्देने महात्मा बसवेश्वरांना वीरशैव लिंगायत धर्मसंस्थापक म्हणतात. त्यांनी संत मन्मथस्वामींचे पुढील वचन पहावे. १६व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेले मन्मथस्वामी म्हणतात -**''धर्म वीरशैव रसातळी जाता। झाला बसव शिवरूपी त्राता।''** आणि ते अगदी समर्पक आहे. आपणही सारे वादविवाद बाजूला ठेवून शुध्द मनाने महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतिकार्यास विनम्र अभिवादन करूया.

**विद्याधर मा. ताठे**
भ्रमणध्वनी : ९८८१९०९७७५,
Email : vidyadhartathe@gmail.com



## संत नरहरी सोनार - चोखामेळा - सेनामहाराज

# कर्मभक्तीचा त्रिवेणीसंगम

सदाशिवसुत

### पूर्वपीठिका

मराठी संतपरंपरा ज्ञानदेव–नामदेव–एकनाथ–तुकाराम–रामदासस्वामी यांच्या जीवनधारणेसह त्यांच्या ग्रंथांद्वारे सर्वदूरपर्यंत पसरली आहे. पण त्यातही भागवत धर्माच्या नावे 'निवृत्ती ते निळोबा' अशी संतपरंपरा मानली जाते. भागवत धर्म वा भागवत संप्रदाय हा वारकरी संप्रदाय या नावाने ओळखला जातो. त्यामुळे उपरोक्त विषयाच्या संदर्भात राहूनच ज्ञानदेव–नामदेव यांच्या प्रभावळीतील तीन संत म्हणजे संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत सेना महाराज यांनी जी कर्मसन्मुख राहून विठ्ठलाची भक्ती केली, तिचाच विचार इथे प्रामुख्याने केला आहे. 'विठ्ठल परब्रह्म' हे दैवत मानून अठरापगड जातींच्या सर्व संतांनी चंद्रभागेच्या वाळवंटी जी 'आध्यात्मिक लोकशाही' नांदविली, त्यामुळे 'उच्च नीच नुरले कांही। पांडुरंग सकला ठायी।' या न्यायाने हे सर्व संत व त्यांच्याबरोबर असलेले वारकरी यांच्या ठिकाणी समता व बंधुता नांदली. भक्तीच्या सन्मार्गावर त्यांची पावले नाम व नीती यांच्या सहाय्याने वाटचाल करीत असल्याने भक्तिप्रसाराचे कार्य अहर्निशी होत राहिले आणि त्यातूनच सत्त्वस्थ समाजाची निर्मिती हळुहळू होत राहिली. अठरापगड जातींच्या संतमंडळींत प्रामुख्याने जनाबाई, गोरा कुंभार, सावता माळी, कान्होपात्रा, चोखामेळा, सेना न्हावी, नरहरी सोनार, परिसा भागवत, बहिणाबाई इत्यादींचा समावेश होतो. त्या

सर्वांच्यावर ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत स्वमतभाष्य करून भक्तीचे मांडलेले तत्त्वज्ञान आणि नामदेव महाराजांनी आपल्या अभंगगाथेमध्ये सगुण-निर्गुण अशा दोन्ही भक्तींविषयी भाविकांच्या मनात उद्भवणारा भक्तिभाव यांचा सर्वाधिक प्रभाव आहे. शिवाय **सर्व संतांनी आपापला उद्योगधंदा वा व्यापारउदीम करीतच भक्ती केली आहे. शिवाय त्यांनीही अभंगरचना करून नाममहिमा सांगितला असून उपदेशही केला आहे.** त्यात समाजभान ठेवूनच या संतांनी आपले आचरण केले हीदेखील विशेष गोष्ट आहे. त्यांचे अभंग 'सकळ संत गाथेत' समाविष्टित केले गेले आहेत ही अत्यंत अलौकिक गोष्ट मानावी लागेल. हे 'भक्तिमंदिर' कसे उभे राहिले आहे, तर संत बहिणाबाई सांगते की, 'ज्ञानदेवे रचिला पाया। तेणे उभारले देवालया। नामा तयाचा किंकर। तेणे केला विस्तार।।' याप्रमाणे अशा भक्तिप्रसार कार्याच्या चौकटीत राहून त्यांनी आपली भक्तिधारणा सिद्ध करून ईश्वरदर्शनाने आपले जीवन धन्य करून घेतले. या प्रभावामुळेच त्यांना ज्ञानदेव-नामदेवांच्या प्रभावळीतील संत असे म्हटले गेले आहे. प्रतिपाद्य विषयास अनुसरून आता आपण तीन संतांचा त्रिवेणीभक्तिसंगम विचारात घेऊ.

## संत नरहरी सोनार

सोनार जातीतील हा संत आपल्या व्यवसायाला सन्मुख ठेवूनच भक्तीत रंगला आहे. तो मूळचा देवगिरी येथील असून प्रथम तो महाकट्टर असा शिवभक्त होता. पुढे पंढरीस आल्यावर तो विठ्ठलभक्त झाला. वैष्णवांच्या मेळाव्यातच त्याला हरिहराचे ऐक्य उमगले. नरहरी सोनाराचे तसे आठ-दहाच अभंग आहेत. सांप्रदायिक गाथ्यात नरहरीदास व नरहरीमालो यांचेही अभंग मिसळले गेल्याने थोडी अभंगसंख्या वाढली आहे. सुवर्णकाराचा व्यवसाय करीत असतानाच या संतकवीने वाग्देवीच्या अंगावर जे काव्याचे लेणे चढविले आहे, ते आकाराने लहान असले तरी ते सतेज आहे. तो माघ कृष्ण शके १२३५ मध्ये समाधिस्थ झाला. त्याचा सोनाराचा व्यवसाय कसा हे त्याच्या रूपकात्मक अशा स्वरूपाच्या एका अभंगातून कळून येते. आपल्या कर्माशी त्याने नामधर्म जोडून भक्तीचा व्यवहार केल्याचे दिसून येते. सोन्याचा दागिना जसा घडवावा, तसा साधक नामसाधनेने घडतो. त्यायोगे त्याला ईश्वरदर्शनाचा आनंद प्राप्त होतो. यासंदर्भात थोडे प्रतिकात्मकरीतीने सांगताना असे म्हणता येईल की, सोन्यात धातू मिसळल्याशिवाय दागिना तयार होत नाही. तसेच दागिना करताना धातूला जोडण्यासाठी डाग दिला जातो. माणसाच्या आयुष्याचे तसेच आहे. शरीररूपी धातू नामरूपी सोन्याशी जोडताना सुवर्णकारस्वरूपी सद्गुरू हे मंत्रदीक्षा (नाममंत्र) स्वरूपात जोडताना डाग देण्याचेच काम करतात. मग त्या मंत्राचे स्मरण-पठन-चिंतन केले असता ईश्वराची अनुभूती येते. अनुभूती हाच परमार्थातील खरा दागिना होय! यासंदर्भात त्याचा एक अभंग प्रसिद्ध आहे, तो असा की **'देवा तुझा मी सोनार। तुझे नामाचा व्यवहार।। देह वागेसरी जाण। अंतरात्मा नाम सोने।। त्रिगुणाची करून मूस। आत ओतिला ब्रह्मरस।। जीवशिवे करूनि फुंकी। रात्रंदिवस ठोकाठोकी।। विवेक हातवडा घेऊन। कामक्रोध केले चूर्ण।। मन बुद्धीची कातरी। रामनाम सोने चोरी।। ज्ञान ताजवा घेऊनि हाती। दोन्ही अक्षरे जोखिती।। खांद्या वाहुनि पोतडी। उतरला पैलथडी।। नरहरी सोनार हरीचा दास। भजन करी रात्रंदिवस।।'** कर्म आणि भक्ती या दोन्हींचा संगम त्याच्या जीवनात असून तोच त्याने अभंगात उतरविला आहे. सर्वांमध्ये महत्त्वाचे काय आहे? तर **'नाम सर्वांमध्ये सार। नरहरी जपे निरंतर।।'** हे होय! प्रपंच-धंदा सांभाळून त्याने परमार्थ केला हेच त्याचे अहोभाग्य!



### हरि-हरा भेद नाही

कट्टर शिवभक्त असलेला नरहरी विठ्ठलभक्त कसा झाला, यासंबंधीची एक हकिकत सांगितली जाते, ती म्हणजे : विठ्ठलाला कमरपट्टा करायचा होता. ते काम नरहरी सोनाराला सांगण्यात आले. तो तयार झाला. पण तो शिवभक्त असल्याने डोळ्यावर पट्टी बांधून विठ्ठलाच्या कमरेचे माप घेई. एकदा पट्टा लहान तरी होई, तर एकदा माप मोठे तरी होई. मग त्याने डोळे उघडे ठेवून माप घेतले. कमरपट्टा अगदी मापाप्रमाणे झाला. शिव-विष्णूभेद संपुष्टात आला. दोन्ही देव अभेदतत्वाने नटले आहेत, हे त्याला कळून आले. मग मात्र त्याची विठ्ठलभक्ती अधिक दृढ झाली.

### संसाराची नश्वरता

भक्ती करता करता त्याला समजून आले की, प्रपंच, संसार हा नश्वर असून परमार्थ मात्र आत्मोद्धार करून घेण्यास पूरक - उपयुक्त आहे. संसार कसा आहे, याचे चित्र त्याने एका अभंगात रंगविले आहे. कसे म्हणाल? तर, **'चितारा चितरे काढी भिंतीवरी। तैसे सारे अवघे जग हे।। पोरे हो खेळती शेवटी मोडिती। टाकुनिया जाती आपुल्या घरा।। तैसे जन सारे करिती संसार। मोहगुणे फार खरे म्हणती।। काही साध्य करा साधुसंग धरा। नाम हे उच्चारा नरहरी म्हणे।।'** संसार किती क्षणभंगुर आहे. भिंत पडली अथवा भिंतीवर पाणी पडले, तर त्यावरील चित्रे कायम राहतील काय? नाहीतच! उलट ती पुसली जातील वा नाहिशी होतील! मृत्यूची एक लाट आली की, सारा संसार उद्ध्वस्त होईल!! तसेच लहान मुले खेळ मांडतात, थोड्या वेळाने मोडूनही टाकतात. संसार हा असाच आहे. तो कधीच पूर्ण होत नसतो. संसार नेहमी अर्धवटच राहतो. उरलेला संसार दुसराच कुणी तरी करू लागतो. तरी मोहाने माणूस त्यातच अडकलेला आहे. म्हणून संसाराबरोबरच परमार्थही करा, असा उपदेश त्याने केला आहे.

### संत चोखामेळा आणि परिवार

ज्ञानेश्वरादी भावंडांचा अपवाद सोडला, तर चोखामेळा हा असा एक संत आहे की, त्याचा सर्व परिवारही विठ्ठलभक्तीत तल्लीन होऊन गेलेला, तसेच त्या सर्वांचे अभंगही असून ते 'सकळ संतगाथा'मध्ये समाविष्टित झालेले आहेत. चोखामेळा हा मंगळवेढे येथे राहणारा, जातीने महार, त्यामुळे उपेक्षित जीवन वाट्याला आलेले, परिस्थितीनेही गांजलेला असा असल्याने त्याने उबग येऊन आपले गाव सोडलेले, पण पुष्कळ फिरूनही मन स्थिर न झाल्याने शेवटी तो पंढरीत आला. विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमत असलेल्या पंढरीतच विसावला. भक्तिमार्गाची वाटचाल करण्यातच त्याने आपले सर्व आयुष्य व्यतीत केले. ज्ञानदेवांच्या पश्चात तो अधूनमधून मंगळवेढ्यास जाऊन पोटापाण्याचा उद्योग करीत असावा, असे दिसते. मंगळवेढ्यात गांवकुसाचे काम करीत असतानाच अंगावर भिंत पडून शके १२६० मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याचे गुरू नामदेव महाराज होते. त्यांनीच त्याच्या अस्थी मातीच्या ढिगाऱ्याखालून वेचून काढल्या. त्या अस्थींतूनही त्यांनी विठ्ठलनाम ऐकले असे म्हणतात. त्याची मंगळवेढा येथेही समाधी आहे आणि पंढरपुरात विठ्ठलमंदिरासमोरही आहे. त्याचे जवळपास साडेतीनशे अभंग आहेत. त्यांत पारमार्थिक वाटचालीबरोबरच काही सामाजिक व्यथांचेही प्रतिबिंब पडलेले दिसते. त्यामुळे कर्मसन्मुख आणि समाजसन्मुख अशा दोन्ही दृष्टीने त्याचे व्यक्तिमत्त्व व अभंगलेखन महत्त्वपूर्ण आहे. त्याचा सर्व परिवारच विठ्ठलभक्तीत रंगून गेला आहे. पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहीण निर्मला, मेव्हणा बंकामहार यांचेही अभंग आहेत. म्हणूनच 'चोखामेळा आणि त्याच्या परिवाराची विठ्ठलभक्ती' असाच एकत्रितपणे विचार केला जातो.

### देही देखिली पंढरी

त्याला देवळातही प्रवेश नव्हता, म्हणूनच तो म्हणतो की, देवा, तुझी-माझी भेट कशी होणार? तुला भेटायला मी आलो की, सर्वजण मला 'दूर हो, दूर हो' असे

म्हणतात. तुम्हाला भेटण्यासाठी माझी हीन जात आडवी येते. देवा, तुला माझी काही करुणा येऊ दे! पण असे असले तरी त्याची भक्तीच इतकी चोख होती की, त्याला देवळाबाहेरच विठ्ठलाचे दर्शन झाले. कसे म्हणाल? तर, तो सांगतो की, **'देही दखिली पंढरी। आत्मा अविनाश विटेवरी।। तो पाहा पांडुरंग जाणा। शांति रुक्मिणी निजांगना।। आकारले तितुके नास। आत्मा अविनाश विठ्ठल दिसे।। ऐसा विठ्ठल ह्रदयी ध्यायी। चोखामेळा जडला पायी।।'** ही आत्मसाक्षात्काराची खूण त्याने व्यक्त केली आहे. त्याच्या उपदेशपर अभंगांत त्याने भक्तीचा डांगोरा पिटला आहे. कसा म्हणाल? तर, तो सांगतो की, **'टाळी वाजवावी। गुढी उभारावी। वाट ती चालावी। पंढरीची।। हरिनाम गर्जता। नाही भयचिंता।। ऐसे बोले गीता। भागवत।। पताकांचे भार। मिळाले अपार। जयजयकारे भरले। भीमातीर।। पंढरीचा हाट। कवुलाची पेठ। मिळाले चतुष्ट। वारकरी।। खटनट यावे। शुद्ध होवोनि जावे। दवंडी पिटी भावे। चोखामेळा।।'** आपण भावशुद्ध कसे आहोत, हेही त्याने **'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा।।'** या अभंगात पुढे म्हटले आहे की, **'चोखा डोंगा परी। भाव नोहे डोंगा।।'** चोखा सरळ भावाचा, शुद्ध मनाचा आहे. विनम्रतेने तो आपण स्वतः डोंगा (वाकडा) असे म्हणतो, पण पुढे लगेच त्याचा भाव मात्र डोंगा नाही, तर सरळ-शुद्ध असल्याचे सांगतो. त्याचा 'जोहार मायबाप जोहार' हा एक अभंग प्रसिद्ध आहे. त्यात त्याने उच्छिष्टासाठी आपण पाटी आणली आहे, असे म्हटले आहे. पण उच्छिष्ट कोणते? तर, तो म्हणजे विठ्ठलाचा कृपाप्रसाद होय! त्याला भूक लागली आहे ती कोणती? तर, विठ्ठलदर्शनाची होय!! ही भूक पूर्ण व्हावी म्हणून त्याने 'जोहार' केला आहे.

### परिवाराची अभंगवाणी

चोखामेळा आणि त्याच्या परिवारातील आप्त-स्वकीय मंडळी यांनीही विठ्ठलभक्ती करून अभंगरचनाही केली आहे. मात्र विस्तारभयास्तव त्यांचा एकेकच अभंग उदाहरणादाखल घेतला आहे. चोखामेळा यांची पत्नी सोयराबाई हिने अभंगरचनेत स्वतःची नाममुद्रा 'चोख्याची महारी' असा केला आहे. तिचा एक बहारीचा अभंग आहे. ती म्हणते, **'अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग।। मी तूं पण गेले वाया। पाहता पंढरीच्या राया।। नाही भेदाचे ते काम। पळोनि गेले क्रोधकाम।। देही असोनि तू विदेही। सदा समाधिस्थ पाही।। पहाते पाहणे गेले दूरी। म्हणे चोख्याची महारी।।'** तिच्या आत्मानुभवाची श्रेष्ठता यातून दिसते.

बंका हा चोखामेळ्याचा मेव्हणा होय! तो सांगतो की, **'जे सुख ऐकता मन ते निवांत। तेचि मूर्तिमंत विटेवरी।। साजिरे गोजिरे श्रीमुख चांगले। कर मिरविले कटावरी।। समचरण दोन्ही शोभती पाऊले। ध्यान मिरविले पंढरीये।। आनंदी आनंद सुखाच्या राशी। घाली चरणासी बंका मिठी।।'** विठ्ठलाच्या सगुण रूपाचे विलोभनीय दर्शन त्याने जैसे देखिला डोळा तैसे वर्णिले आहे. **बहीण निर्मळा** म्हणते की, 'मज नामाची आवडी। संसार केला देशघडी। सापडले वर्म सोपे। विठ्ठलनाम मंत्र जपे।। नाही आणिक साधन। सदा गाय नारायण। निर्मला म्हणे देवा। छंद एवढा पुरवावा।।' संसारापेक्षा परमार्थच तिला विशेषत्वाने आवडतो. **मुलगा कर्ममेळा** म्हणतो की, 'सुखदुःख दोन्ही आमुचे पदरी। पूर्वीच निर्धारी बांधियेले।। आता वाईट म्हणो कशासाठी। आमुची ती राहाटी भोगु आम्ही।। तुम्ही तो व्यापक सर्वांसी निराळे। आमुची कर्मफळे भोगु आम्ही।। कर्ममेळा म्हणे वचन प्रमाण। आमुची निजखूण कळली आम्हा।।' इथे दोन गोष्टी विशेषत्वाने सांगावयाच्या, त्या ह्या की, (१) सर्व कुटुंबीयांनी दुःख, उपेक्षा भोगली, पण त्याचे खापर कुणावर फोडलेले नाही. प्रारब्ध म्हणून त्यांनी ते स्वीकारले आहे. (२) दुःख-उपेक्षा याविषयी त्यांनी फक्त पांडुरंगाकडे मागणे मागितले आहे, त्याच्या कानी आपले गाऱ्हाणे घातले आहे. त्यावेळी संघटना नव्हती. त्यामुळे सामाजिकस्तरावर त्यांना चळवळ करणेही शक्य नव्हते. फक्त अभंगांतून त्यांनी आपल्या दुःखाला वाचा फोडली आहे, इतकेच! अर्थात्, हाच चळवळीचा प्रारंभ म्हणावा लागेल!! आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी

की, चोखामेळ्याची समाधी त्याचे गुरु नामदेव महाराजांच्या समाधीपुढे (नामदेवांच्या पायरीसमोर) आहे. त्यामुळे देव व गुरु या दोघांकडे कृपाशीर्वादाच्या अपेक्षेने तो पाहात उभा आहे. विठ्ठलानेही त्याला मंदिराबाहेर येऊन दर्शन दिल्याचा उल्लेख त्याच्या अभंगात आहे. त्याची जागा दोन्ही अर्थाने महत्त्वाची, म्हणजे अलौकिक आहे, असेच म्हटले पाहिजे.




## संत सेनामहाराज

कर्मसन्मुख राहून, आपल्या व्यवसायाचे रूपक करून, त्याद्वारे सामाजिक प्रबोधन करणारा संत म्हणजे सेना न्हावी तथा सेनामहाराज हा होय! तो मूळचा महाराष्ट्रातील नसून जबलपूरजवळ असलेल्या बादुगड येथील होय! तेथे राजाच्या पदरी राहून त्याची सेवा तो करीत होता. दुसरे एक मत असे आहे की, रीवा येथील राहणारा असून रामानंदांचा शिष्य होता. त्याचे नाव सेना नसून सैना असे होते. त्याचे हिंदी अभंगही प्रसिद्ध आहेत. तो महाराष्ट्रात का व कसा आला म्हणाल? तर, पंढरीच्या पांडुरंगाची कीर्ती त्याच्या कानावर पडल्याने पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ त्याला लागली. तो पंढरीत आला आणि पंढरीतच रमला. त्याचे सुमारे दीडशे अभंग उपलब्ध आहेत. श्रावण वद्य १२ हा त्याचा समाधिकाळ आहे. पण, त्याच्या जन्म-मृत्यूचे शतक मात्र उपलब्ध नाही. हजामती करणे हा त्याचा धंदा होता. त्याचे प्रतीकात्मकरूप त्याने आपल्या अभंगांत घेऊन त्याद्वारे व्यक्ती व समाज या दोघांनाही उपदेश केला आहे. कसा म्हणाल? तर, तो सांगतो की,

## विवेक आणि वैराग्य

'आम्ही वारीक वारीक। करू हजामत बारीक।। विवेक दर्पण आयना दावू। वैराग्यचिमटा हालवू।। उदकशांती डोई चोळ। अहंकाराची शेंडी पिळ।। भावर्थाच्या बगला झाडू। कामक्रोध नखे काढू।। चौवर्णी देऊनि हात। सेना राहिला निवांत।।' परमार्थासाठी विवेक-वैराग्य हवे, तसा अहंकार आणि दुर्गुणही नकोत, हे त्यांनी चहुवर्णास उपदेशिले आहे. साधना कशी करावी? तर, सेनामहाराज सांगतात की, **'असाल तेथे नामाचे चिंतन। याहुनि साधन आणिक नाही।। सोडविल माझा भक्तांचा कैवारी। प्रतिज्ञा निर्धारी केली आम्ही।। गुणदोष याती विचारी न कांही। धांवे लवलाही भक्तकाजा।। अवघेकाळी वाचे म्हणा नारायण। सेना म्हणे जाऊ न द्या।।'** देवा, तुझी पायसेवा घडो, असेच मागणे त्याने केले आहे. आपण कृतार्थ झालो, उद्धरून गेलो, याची ग्वाही त्याने एका अभंगात दिली आहे. कशी म्हणाल? तर, 'करितो विनवणी। हात जोडोनिया दोन्ही।। हेचि द्यावे मज दान। करा हरीचे चिंतन।। जातो सांगोनिया मात। पांडुरंग बोलावित।। सोडा द्वादशी पारणे। सुखे करावे कीर्तन।। दिवस माध्यान्ही आला। सेना वैकुंठासी गेला।।' तसेच, 'माझे झाले स्वहित। तुम्हा सांगतो निश्चित।। करा हरीचे कीर्तन। गावे उत्तम हे गुण।। श्रावण वद्य द्वादशी। सेना समाप्त त्या दिवशी।।' कर्मसन्मुख हरिचिंतन करून सेना उद्धरून गेला.

नरहरी सोनार, चोखामेळा आणि त्यांचा परिवार, सेनामहाराज म्हणजे 'कर्मसन्मुख-भक्तिसंगम' असा आहे.



# गुरुचरित्रातील पुरुषोत्तमयोग
# गुरुसेवेने परब्रह्माची उपासना

प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे


प.पू. वासुदेवानंद सरस्वती तथा टेंबेस्वामी महाराज हे मागील शतकात होऊन गेलेले श्रेष्ठ दत्तभक्त-योगीराज होते. त्यांनाही गुरुदत्तात्रेयांचे अंशावतार मानले जाते. (जन्म - श्रावण वद्य पंचमी, इ.स. १८५४ला माणगांव (कोकण) येथे झाला. नृसिंहवाडी हे त्यांचे कार्यक्षेत्र आणि आषाढ शुद्ध प्रतिपदा, इ.स. १९१४ला नर्मदा किनारी गरुडेश्वर (बडोदा) येथे त्यांनी समाधी घेतली.) भारतभर भ्रमण, एकूण २४ ठिकाणी चातुर्मास केले. प्रभू दत्तात्रेयांशी संभाषण आणि त्यांच्याच आज्ञेने ग्रंथ व स्तोत्रे निर्मिली. प्रतिपाद्य विषयाशी निगडित असलेला ओवीग्रंथ 'श्रीसप्तशती गुरुचरित्रसार' पोथीस्वरूपात लिहिला. (शके अठराशे चोविसांत, गंगातिरी, मराठी भाषेत सप्तशती)

'श्रीसप्तशती गुरुचरित्रसार' पोथीचे रचनात्मक वैशिष्ट्य असे की, ७०० ओव्या लिहून त्याद्वारे गुरुचरित्रातील कथा व बोध तर लिहिले आहेच, याचबरोबर त्यातील अद्याक्षरांपैकी प्रत्येक तिसरे अक्षर घेऊन ते उभे वाचले, तर २० श्लोकी 'पुरुषोत्तम' हा

पंधरावा अध्याय गीतेचा तयार होतो. गुरुचरित्र व भगवद्गीता यांत अन्तर्मेळ घालून एक श्लोक जिथे पूर्ण होतो, तिथपर्यंत पोथी-गुरुचरित्रातील कथानके पूर्ण होऊन त्यातील कथांना गीतेच्या पंधराव्या अध्यायातील श्लोकांतून जे भक्तिज्ञान प्रकट होते त्याच्याशी कथाप्रसंग जोडले आहेत. या रचनाविशेषत्वातच 'भक्तिरहस्य' दडलेले आहे, हे लक्षात येते. गुरुचरित्रातील 'पुरुषोत्तम' कोण? त्यांची 'सेवा' कशी करायची? त्या सेवेने परब्रह्मस्वरूप भगवंताची प्राप्ती कशी करून घ्यायची, हाच गुरुबोध जो केला आहे त्याचा मागोवा इथे विनम्रपणे घेण्याचा प्रयत्न केला आहे. रहस्यमय ओवीरचनेतच 'भक्तिरहस्य' दडले आहे, हे मात्र निश्चितच होय!

**व्यास - ज्ञानदेव - गुरुदेव**

व्यासमहर्षींनी 'महाभारत' ग्रंथात गीता लिहिली आहे. त्यात 'पुरुषोत्तमयोग' २० श्लोकांत (संस्कृत) असून, श्रीज्ञानदेवांनी स्वमतभाष्यासहित भगवद्गीतेवर ओवीभाष्य (मराठी) केले आहे. थोर तत्त्वज्ञ व साक्षात्कारी संत डॉ. रा. द. तथा श्रीगुरुदेव रानडे यांनी 'ध्यानगीता' या संकलित व संपादित स्वरूपात ३६५ श्लोक घेऊन १२ अध्यायी गीतेची मांडणी केली असून, त्यावर उपशीर्षके देऊन भाष्य केले आहे. त्यांनी ध्यानगीतेत पुरुषोत्तमयोगमधील १२ श्लोक घेतले आहेत. पंधराव्या अध्यायातील श्लोकानेच त्यांनी ध्यानगीतेचा प्रारंभ केला आहे. त्यामुळे व्यास-ज्ञानदेव-गुरुदेव यांनी केलेल्या भाष्यांचाही संदर्भ 'श्रीसप्तशती गुरुचरित्रसार'मध्ये कशा रीतीने लागू पडतो, हे पाहिल्यानेच 'भक्तिरहस्य' उलगडून पाहायला सहाय्य झाले आहे. हे भक्तिरहस्य जाणून घेताना संपूर्ण ७०० ओव्या, तसेच १५व्या अध्यायातील २० श्लोक पूर्णत्वाने पाहता येणार नाहीत. विस्तारभयास्तव फक्त काही महत्त्वपूर्ण संदर्भातूनच 'गुरुबोध' उलगडून पाहिला आहे. (संपूर्ण विवेचनासाठी जिज्ञासूंनी माझे 'श्रीसप्तशती गुरुचरित्रसार : भक्तिरहस्य' हे पुस्तक पाहावे. सुविद्या प्रकाशन, प्र. आ. २०१५, पृष्ठे १८५, मूल्य रु. १००) इथे मात्र ओवीबंध व श्लोक नोंदविले आहेत. भक्तिमार्गावर वाटचाल करणारी मंडळी प्रापंचिक असून, ती परमार्थप्रवृत्त होऊनच भक्तिसाधना करीत असतात, हे जाणूनच श्रीटेंबेस्वामी यांनी १५व्या अध्यायाची निवड केलेली असावी, असे वाटते. कारण, प्रपंचासह परमार्थ करीतच ती परब्रह्माची प्राप्ती करून घेण्याचे ध्येय ठेवून गुरुबोधाच्या आधारे नाम आणि नीती या पाऊलबळाने वाट आक्रमित असतात.



महर्षी व्यास



ज्ञानदेव माउली



श्रीसाईबाबा

श्रीगुरुचरित्र ग्रंथातही श्रीनृसिंह सरस्वती यांनी दुःखी-कष्टी प्रापंचिकांवर 'कृपा' करून त्यांना गुरुसेवेतून ईश्वरप्राप्तीचा 'मार्ग' दाखविला आहे. गुरुभेट - गुरुमंत्रप्राप्ती - स्मरणोपासना यांद्वारे त्यांनी दुःखमुक्त करून पारमार्थिक सुखाचा हितोपदेश केला आहे. गुरुकृपेने घडून आलेल्या गोष्टींना चमत्कार जरी म्हटले जात असले तरी चमत्कार घडून येण्याचे कारण 'लोकोद्धार' हेच आहे. त्यायोगेच आत्मकल्याण होऊन जीवन कृतार्थ होते, ही त्यातील सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट होय! सांसारिकांनी परमार्थी व्हावे, हाच त्यातला बोध!!

**संसारवृक्षाचे स्वरूप**

तुम्ही-आम्ही ज्या संसारात गुरफटलेलो आहोत, तो संसार कसा आहे, हे गीतेच्या १५व्या अध्यायातील पहिल्याच श्लोकातून प्रकट केले गेले आहे. महर्षी व्यासांनी त्यात ज्याचे मूळ वर आहे, ज्याच्या फांद्या खाली आहेत, तो अश्वत्थवृक्ष विनाशी आहे; पण सामान्यजन त्यालाच अविनाशी असल्याचे मानतात. प्रपंचरूपी फांद्या एकमेकांना कांचतात, म्हणूनच हा प्रपंच दुःखमूळ आहे. उर्ध्वमूळ आहे तो ईश्वर होय! ज्ञानदेवांनी याच संसाराला क्षणभंगुर म्हटले असून, या देहरूपी मोहपाशात ज्ञानी अडकत नाही; उलट तो ईश्वरप्राप्ती करून घेऊन, आत्मोद्धार करून नंतर लोकोद्धारही करतो, अशी भूमिका मांडली आहे. श्रीगुरुदेव रानडे यांनी असंगशस्त्राने या फांद्या तोडाव्यात, असे जे व्यासांचे प्रतिपादन आहे, त्याचा अर्थ विशद करताना असंगस्त्राऐवजी नामशस्त्राने तोडावे, असे प्रतिपादिले आहे. संसाराचा त्याग न करता भक्तिप्रेमाने ईश्वरप्राप्ती करून घेण्याचा साधनमार्ग अनुसरावा. तसे करताना प्रापंचिक मायामोहापासून संयमाने अलिप्त राहावे. नामशस्त्राने, म्हणजे गुरुभेट होऊन गुरुकृपांकित नामाचे स्मरण करावे, म्हणजे सद्गुरुकृपा घडून येऊन ईश्वरप्राप्ती (ईश्वरदर्शन) होईल असा साधनेतून साक्षात्काराकडे जाणारा भक्तिमार्ग विशद केला आहे. पहिल्या श्लोकाला व्यापणारे तीन अध्याय टेंबेस्वामींनी लिहिले आहेत. त्यात अंबरीषाची कथाही आली असून, भक्तरक्षणासाठी दशावतार झाले. ते घेणारा दत्तात्रेय हाच परब्रह्मस्वरूप विष्णू होय, हे सांगून गुरुचरित्राच्या संदर्भाने 'दत्ता मला भेट देई, तूचि मूर्तिमंत ब्रह्म। त्रिमूर्ती तूं गुरु परम। कलियुगी मंगलधाम। भक्तकामपूरक।।' असे नमूद करून दत्तावतारांचे प्रकटरूप स्पष्ट करताना अत्रि-अनुसूया यांचे पुत्र दत्तात्रेय यांची जन्मकथाही सांगितली आहे. भक्तोद्धारक दत्तगुरूंचे अवतार सांगतानाच गुरुचरित्राचे नायक श्रीनृसिंह सरस्वती हेच ब्रह्मस्वरूप - पुरुषोत्तम असल्याचे स्पष्ट केले आहे. 'गुरु तोचि देव' ही धारणा झाली म्हणजे त्यातून गुरुबोधाच्या संदर्भाने लोकोद्धाराच्या अनेक हकिकती अध्यायातून प्रकट झाल्याचे कळून येते.

**साधना-उपासना हवीच**

गीतेत कर्म-ज्ञान-ध्यान यांचा समन्वय आहे, ही गोष्ट खरी असली तरी ईश्वरप्राप्तीसाठी ध्यान हे महत्त्वाचे आहेच आहे. साधना-उपासना ही ध्यानयोगाला अत्यंत उपकारक असणारी गोष्ट आहे. टेंबेस्वामी हे कर्म (संन्यस्त धर्माचे आचरण), ज्ञान (अध्यात्मविद्येचे ग्रंथोक्त अध्ययन), तसेच ध्यान (योगमार्गी) यांचा समन्वय राखणारे होते. प्रत्यक्ष दत्तमहाराजांशी संभाषण आणि आज्ञांचे पालन हा त्यांचा जीवनधर्मच बनला होता. त्यामुळे गुरुचरित्राच्या माध्यमातून त्यांनी 'परमात्मा हाच उत्तम पुरुष होय' हे प्रतिपादिले आहेच, हेही सांगितले आहे. तो परमात्मा कळून घ्यायचा असेल, तर त्यासाठी साधना-उपासना करणे अत्यावश्यक आहे. सप्तशती गुरुचरित्रात अध्याय ४०मध्ये 'विप्रकुष्ठहरणनाम' हा कथाभाग आहे. या अध्यायाला गीतेतील पुरुषोत्तम अध्यायातील १५वा श्लोक व्यापून राहिला आहे. 'नरहरी'नामक ब्राह्मणाला


कुष्ठरोग झालेला आहे. तो श्रीनृसिंह सरस्वतींकडे येतो आणि मला दुःखमुक्त (रोगमुक्त) करा, अशी प्रार्थना करतो. अन्यथा मी प्राण सोडीन, असेही सांगतो. त्यावर श्रीगुरूंनी त्याला 'रोग बरा करेन' असे आश्वासन दिले. पण त्यासाठी एक उपासनाही दिली आहे. कोणती म्हणाल? तर, एका शुष्क काष्ठाला त्याने संगमावर जाऊन रोवावे व त्याची सेवा करावी, त्यास पाणी घालावे. त्या काष्ठाला जेव्हा पाने फुटतील तेव्हा त्याचा कुष्ठरोग बरा होईल. इथे रोग बरा करण्याचे त्यांचे आश्वासन म्हणजे त्याने नरहरीवर केलेली कृपा होय! पण तेवढे पुरेसे नाही. तर ती कृपा फलद्रुप व्हायला त्याने उपासनाही करायला हवी. शुष्क काष्ठास पालवी लगेच थोडीच फुटणार आहे? नाही. मग त्यासाठी रोज पाणी घालावे लागेल. श्रीगुरूंची सेवा म्हणजेच त्याने गुरुनामाचे सतत स्मरण करूनच पाणी घातले पाहिजे. स्मरणोपासनेनेच काही कालावधीनंतर कुष्ठाला पाने फुटणार हा संकेत त्यात समाविष्टित आहे. नरहरीने अपार श्रद्धेने साधना-उपासना केली. त्याचा रोग बरा झाला. गुरुकृपेचे फळ उपासनेशिवाय शक्य नाही हा गुरुबोध त्यातून प्रकटला आहे, हे इथे लक्षात येते. 'गुरु तोचि देव' हेही भक्तांना समजले. तसेच, गुरुसेवेनेच त्यांच्या ठायीचे परब्रह्म कळणार, ही गोष्टही त्यातून स्पष्ट झाली आहे. नरहरीने नंतर 'गुरुस्तुती' केली आहे. त्यात गुरुकृपा, गुरुस्वरूप व फलप्राप्ती यांचा निर्देश त्याने तिथे केला आहे. अपार श्रद्धेने गुरुसेवा केल्यासच गुरुकृपा कळून येते. 'पर्वतेश्वर'नामक एक गुरुभक्त होता. त्याला आपल्या शेतात खूप धान्य यावे, असे वाटत होते. तेव्हा श्रीगुरूंनी सांगितले की, 'मी संगमावर जाऊन येतो, तोवर शेतातील उभे पीक कापून टाक.' ही गुर्वाज्ञा पाळून त्याने तसे केले. पुढे पाऊस सुरू झाला. इतरांच्या पिकाची नासाडी झाली. पण पर्वतेश्वराच्या शेतातले कोंब उगवून ते पीक वाढले. किती म्हणाल? तर, दुप्पट झाले. गुर्वाज्ञापालनाने कल्याणच होणार, हीच त्याची श्रद्धा होती व ती गुरुकृपेने फलद्रुप झाली. 'गुरु हाच परमात्मा असून, तोच पुरुषोत्तम' आहे, अशी खात्री अशासारख्या अनेक कथांतून दिली गेली आहे.

### नृसिंह सरस्वतींचे सर्वव्यापित्व

ईश्वर 'परब्रह्म'स्वरूप असून, तो सर्वव्यापी, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान आहे, हे सर्वांना विदित आहेच! पण 'अनुभूती' आल्याशिवाय भक्तांचा विश्वास बसत नाही. 'सप्तशतीगुरुचरित्रसार'मध्येही त्यासंदर्भातील दोन कथा पाहावयास मिळतात. (१) नृसिंह सरस्वती यांनी कुमसी येथे विश्वरूपदर्शन दाखविण्याची कथा अध्याय २४मध्ये येते. गीतेतील अध्याय १५मधील सहावा श्लोक 'सप्तशतीगुरुचरित्रसार', अध्याय २४मधील 'त्रिविक्रम भारती'नामक संन्याशाला 'विश्वरूपदर्शन' दिले आहे. त्रिविक्रम भारती कुमसी येथे राहात होता. नृसिंह सरस्वती संगमावर जाताना पालखीत बसत. त्यांच्याबरोबर स्वार व लवाजमा असे. त्यामुळे त्रिविक्रम भारतीस वाटले की, 'हा कसला संन्यासी? त्याला हे वैभव हवे कशाला?' हे जाणून श्रीगुरु त्याला भेटण्यास कुमसी येथे निघाले. त्यांच्याबरोबर ग्रामाधिपतीचे सैन्यदलही होते. त्रिविक्रमास सर्व सैन्यदल यतिवेशधारी दिसू लागले. ते पाहून तो वरमला, श्रीगुरूंस शरण गेला. त्यांनी आशीर्वादही दिला. अशा रीतीने श्रीगुरूंनी त्रिविक्रमास विश्वरूपदर्शन दिले. श्रीटेंबेस्वामी लिहितात की, 'गुरू तयाचा गर्व हरती। त्या दाविती निजरूप।।' तिथूनच पुढे श्रीगुरु सैन्यासह गाणगापुरी आले. (२) श्रीसप्तशतीगुरुचरित्रसारमधील अध्याय ४७वा 'दीपावल्य उत्सव वर्णनम' असून, त्यात 'भक्त अतिप्रियात। दिवाळीच्या सणानिमित्त। न्याया गुरुसी गृहाप्रत। प्रार्थिता सप्तग्रामवासी।।' त्यांना संतुष्ट करण्यासाठी श्रीगुरू दिवाळीच्या दिवशी त्या सातही भक्तांच्या घरी आले होते. शिवाय त्यांना काही लोकांनी

गाणगापूर येथील मठातही पाहिले. त्यावरून त्यांचे सर्वव्यापित्व सिद्ध झाले आहे. प्रत्येक जणाने 'माझ्या घरी श्रीगुरू आले होते' हेच सांगितले. उत्कट भक्ती करणाऱ्यास त्याचे गुरू त्याच्या निकटच असतात, हेही यातून प्रतिपादिले गेले आहे. गीतेतील १५व्या अध्यायात गुरु/ईश्वर हा सर्वव्यापी आहे, हेच प्रतिपादिले गेले असल्याने तेच 'पुरुषोत्तम' आहेत, हेच सिद्ध होत आहे. नंदिनामा नावाच्या भक्तालाही कुष्ठरोग झाला होता. तो त्यांनी केवळ कृपाकटाक्षाने बरा केला. गुरुशक्तीची साक्ष त्यातून प्रकट झाली आहे. त्यानेही गुरुस्तुती केली आहे. गीतेतील १५व्या अध्यायातील श्लोकांतून जे ईश्वरविषयक तत्त्वज्ञान प्रकट केले गेले आहे, ते त्या श्लोकांतील प्रत्येक अध्यायातील कथानकांशी संलग्न करून 'गुरुबोध' प्रकट केला गेला आहे.

**श्रीगुरू हेच 'पुरुषोत्तम'**



श्रीसप्तशतीगुरुचरित्रसार ग्रंथाशी गीतेतील १५व्या अध्यायातील श्लोक निगडित करून तत्त्वज्ञान व अनुभूती यांच्यातील अंतर्मेळ दाखवून देऊन श्रीटेंबेस्वामी यांनी 'श्रीगुरू हेच पुरुषोत्तम' होत, हेच सिद्ध केले आहे. 'भक्तिरहस्य' कोणते म्हणाल? तर, ते हेच की, अपार श्रद्धेने गुरुसेवा केल्यास श्रीगुरू आपल्या कृपाशक्तीने भक्तांचे कल्याण करतात. म्हणून उपासना दृढ धरून, हेच भक्तिमाहात्म्य जाणून घ्यायचे आहे. त्यासाठी उपासनेची दोन अंगे, म्हणजे ग्रंथपारायण आणि गायत्रीमंत्रपठन होत. 'अंतःकरण असता पवित्र। सदाकाळ वाचावे गुरुचरित्र।।' तसेच, 'त्रिपदा गायत्री जपे कोणी। जपणाऱ्यासी सर्वसिद्धी।।' ही दोन्ही बोधवचने सर्वाधिक महत्त्वाची असून, ती गुरुचरित्रात आहेत. त्रिपदा गायत्रीमंत्र कोणता, तर तो –

**ॐभूः ॐभुवः ॐस्वः**
**ॐमहः ॐजनः ॐतपः ॐसत्यम्।।१।।**
**ॐतत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि**
**धियोयोनः प्रचोदयात्।।२।।**
**आपोज्याती रसोऽमृतम् ब्रह्मभूर्भुवः स्वरोम्।**
**ॐविष्णवे नमः।।३।।**

सर्वसिद्धी, म्हणजे कामनापूर्ती, दत्तदर्शन, बाधानिरसन होय! श्रीटेंबेस्वामी यांनी 'गुरुचरित्रसार' या सप्तशती – ओवीग्रंथात पुरुषोत्तमयोगमधील 'जीवोद्धाराची भूमिका' आणि गुरुचरित्रामधील 'लोकाद्धाराचे कार्य' यांचा समन्वय केला आहे. श्रीनृसिंह सरस्वती यांनी 'गाणगापुरी आम्ही गुप्त राहू' अशी भाक दिली आहे. 'पादुकापूजन' केल्यास 'भक्तिमान भावी जसा जसा। त्यापाशी मी तसा तसा।' असे अभिवचन दिले आहे. 'मठी ठेवितो आपुल्या पादुका' असे सांगून 'आपण निरंतर गाणगापुरी राहू' असेही म्हटले आहे. 'सप्तशतीगुरुचरित्रसार' ही पोथी सर्वांना वाचता येते. टेंबेस्वामी यांनी श्रीदत्तमहाराजांच्या आज्ञेने व कृपेनेच रचिली असल्याने त्यांचे शब्द 'अक्षरमंत्र' स्वरूप झाले आहेत. त्यामुळे त्या अक्षरांचे वाचन-पठन-श्रवण-लेखन केले तरी श्रीगुरुकृपेची प्राप्ती होईल, ही गोष्ट निःसंशय खरी आहे. 'दृढ धरू तव चरण' ।।इति।।

शिर्डी वृत्त

# श्रीरामनवमी उत्सव मंगलमय वातावरणात साजरा...



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित केलेल्या श्रीरामनवमी उत्सवास मंगलमय वातावरणात सुरुवात झाली. श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी राज्यातून पालख्यांसोबत आलेल्या पदयात्री साईभक्तांच्या श्रीसाईनामाच्या गजराने अवघी शिर्डी दुमदुमून गेली.

उत्सवाच्या प्रथम दिवशी पहाटे काकड आरतीनंतर साईबाबांच्या फोटोची व श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक व्दारकामाईपर्यंत काढण्यात आली. या मिरवणुकीत विश्वस्त ॲड. मोहन जयकर, सौ. स्मिता जयकर व सौ. सरस्वती वाक्चौरे हे सहभागी झाले होते. तर, संस्थानचे प्रशासकीय अधिकारी श्री. अशोक औटी व सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक श्री. विश्वनाथ बजाज यांनी श्रींची प्रतिमा, मंदिर विभागाचे पर्यवेक्षक श्री. संजय कुंभार यांनी वीणा व आय.टी.आय.चे प्राचार्य श्री. शिवलिंग पटणी यांनी पोथी घेऊन मिरवणुकीत सहभाग घेतला. या प्रसंगी संस्थानचे अधिकारी, सर्व विभागांचे प्रमुख, कर्मचारी, ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिरवणूक व्दारकामाईत पोहोचल्यानंतर श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाचा शुभारंभ झाला. यामध्ये विद्युत विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. विजय रोहमारे यांनी पहिला, जनसंपर्क अधिकारी श्री. मोहन यादव यांनी दुसरा, सभाकामकाज अधीक्षक श्री. नवनाथ कोते यांनी तिसरा, प्रसादालय अधीक्षक श्री. विष्णू थोरात यांनी चौथा व बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. रघुनाथ आहेर यांनी पाचवा असे सुरुवातीचे पाच अध्याय वाचले.

सकाळी ६.१५ वाजता प्रशासकीय अधिकारी श्री. सूर्यभान गमे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शोभाताई गमे यांनी श्रींची विधिवत पाद्यपूजा केली. दुपारी १२.३० वा. श्रींची माध्यान्ह आरती झाली. यावेळी विश्वस्त श्री. बिपीनदादा कोल्हे उपस्थित होते. सायंकाळी ४.०० वा. समाधिमंदिराशेजारील स्टेजवर ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांचे कीर्तन झाले. सायंकाळी ६.३० वाजता श्रींची धूपारती होऊन सायं. ७.३० ते रात्रौ १०.१५ या वेळेत श्री. निनाद आजगांवकर, मुंबई यांचा गीतरामायण हा कार्यक्रम झाला. रात्रौ. ९.१५ वा. श्रींची गावातून पालखीमिरवणूक काढण्यात आली.

उत्सवाच्या या प्रथम दिवशी व्दारकामाई पारायणासाठी रात्रभर उघडी ठेवण्यात आली. संस्थान प्रशासनाने संभाव्य गर्दीचे नियोजन केलेले असल्यामुळे सर्व साईभक्तांना सुखकर व सुलभतेने बाबांच्या दर्शनाचा लाभ झाला. उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन संस्थान प्रशासनाने दर्शनरांगेसह ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. मंदिरपरिसरात व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी उभारलेला श्री साईसच्चरित या ग्रंथातील अध्याय क्रमांक ५मधील प्रसंगावर आधारित साई समर्थ हा भव्य देखावा व विद्युत रोषणाई पाहण्यासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली होती.

गुजरातमधील भरूच येथील श्री साईराम गुरुजी यांनी भरूच ते शिर्डी हे ५६० कि.मी. अंतर १४ दिवसांत उलट पाऊली चालून पूर्ण करून श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. श्री साईराम गुरुजी हे भरूच येथे आश्रमात राहत असून वर्षातून चार वेळा श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा, विजयादशमी व श्री दत्तजयंती या उत्सवांत उलट पाऊली चालत येऊन श्री साईसमाधीचे दर्शन घेत आहेत. त्यांचे हे ४४वे वर्ष आहे.

# श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी रात्रभर मंदिर दर्शनाकरिता खुले!



श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिनी श्रीसाईसमाधीचे भावपूर्ण दर्शन घेताना संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. नलिनी हावरे...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित केलेल्या श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी रात्रभर मंदिर दर्शनाकरिता खुले ठेवण्यात आल्याने कैक भक्त-भाविकांनी श्रींच्या समाधीचे दर्शन घेतले.

या दिवशी पहाटे काकड आरतीनंतर अखंड पारायणाची समाप्ती करण्यात आली. श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची व्दारकामाईतून गुरुस्थानमार्गे सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे, विश्वस्त ॲड. मोहन जयकर, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे, सौ. नलिनी हावरे, सौ. स्मिता जयकर व सौ. सरस्वती वाकचौरे हे सहभागी झाले होते. तर, संरक्षण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. मधुकर गंगावणे यांनी वीणा, प्रशासकीय अधिकारी श्री. दिलीप उगले व खरेदी विभागाचे अधीक्षक श्री. अविनाश कुलकर्णी यांनी श्रींची प्रतिमा व वैद्यकीय अधीक्षिका डॉ. मैथिली पितांबरे यांनी पोथी घेऊन मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी संस्थानचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थानचे मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री. बाबासाहेब घोरपडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. प्रतीक्षा घोरपडे यांच्या हस्ते समाधिमंदिरात श्रींची पाद्यपूजा करण्यात आली. वरिष्ठ लेखापाल श्री. वसंत जेजुरकर यांच्या हस्ते व्दारकामाईतील गव्हाच्या पोत्याची पूजा करण्यात आली. भांडार अधीक्षक श्री. अशोक झुरंगे यांच्या हस्ते लेंडीबागेतील ध्वजाचे पूजन करण्यात आले.

सकाळी १०.०० वा. ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांचे श्रीरामजन्मावर कीर्तन झाले. माध्यान्ह आरतीपूर्वी रासने कुटुंबीय व देशपांडे (निमोणकर) कुटुंबीय यांच्या वतीने नवीन निशाणांची विधिवत पूजा करण्यात आली. या प्रसंगी संस्थानचे विश्वस्त श्री. बिपीनदादा कोल्हे उपस्थित होते. त्यानंतर दुपारी ४.०० वा. निशाणांची मिरवणूक काढण्यात आली. सायं. ५.०० वा. श्रींच्या रथाची शिर्डी गावातून मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले. सायं. ६.०० वा. मंदिरप्रमुख श्री. रमेश चौधरी व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.

(पृष्ठ ३१वर)



श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिनी वीणा (संस्थानच्या संरक्षण विभागातील पोलीस उपनिरीक्षक श्री. मधुकर गंगावणे), श्री साईंची तसबीर (संस्थानचे प्रशासकीय अधिकारी श्री. दिलीप उगले व खरेदी विभागाचे अधीक्षक श्री. अविनाश कुलकर्णी) व 'श्री साईसच्चरित' पोथी (संस्थानच्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधीक्षिका डॉ. सौ. मैथिली पितांबरे) यांची शोभायात्रा द्वारकामाईकडून परत समाधिमंदिराकडे...



श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिनी समाधिमंदिरात संस्थानचे मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री. बाबासाहेब घोरपडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. प्रतीक्षा घोरपडे यांनी श्रींची विधिवत पाद्यपूजा केली.



श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिनी श्री साईबाबांच्या समाधीचे भावपूर्ण दर्शन घेताना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विश्वस्त ॲड. मोहन जयकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. स्मिता जयकर...

(पृष्ठ २९वरून)

अलका चौधरी यांच्या हस्ते श्रींची पाद्यपूजा करण्यात आली. सायं. ६.३० वा. श्रींची धूपारती झाली. सायं. ७.३० ते रात्रौ १०.१५ या वेळेत श्री. सुदेश भोसले, मुंबई यांचा भावगीत/भक्तिसंगीत या कार्यक्रमास श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रात्रौ ११.०० ते पहाटे ५.०० या वेळेत श्रींच्या समोर कलाकार हजेरी हा कार्यक्रम झाला. समाधिमंदिर रात्रभर खुले ठेवल्यामुळे कैक भक्त–भाविकांनी श्रींच्या समाधीच्या दर्शनाचा लाभ घेतला.

नागपूर येथील साईभक्त श्रीमती रिम्पल लोहिया यांच्या देणगीतून समाधिमंदिर व परिसरात करण्यात आलेल्या फुलांच्या आकर्षक सजावटीने साईभक्तांचे लक्ष वेधून घेतले, तर मुंबई येथील व्दारकामाई मंडळाने उभारलेला श्री साईसच्चरित या ग्रंथातील अध्याय क्रमांक ५मधील प्रसंगावर आधारित श्री साई समर्थ हा भव्य देखावा आणि लेडींबागेतील व्दारकामाई मंदिरातील दीपोत्सवाचा चलचित्र असलेला देखावा व विद्युत रोषणाई उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले.



ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांचे गोपाळकाला कीर्तन





फुलांची आकर्षक सजावट

# श्रीरामनवमी उत्सवाची काल्याच्या कीर्तनाने सांगता



**श्रीरामनवमी उत्सवाच्या सांगता दिनी समाधिमंदिरात संस्थानच्या प्रकाशने विभागाचे अधीक्षक श्री. राजतिलक बागवे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंगला बागवे यांनी श्रींची विधिवत पाद्यपूजा केली.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने शुक्रवार, दिनांक १२ एप्रिल २०१९ पासून सुरू झालेल्या श्रीरामनवमी उत्सवाची सांगता ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्साही वातावरणात झाली.

उत्सवाच्या सांगता दिनी सकाळी संस्थानच्या प्रकाशने विभागाचे अधीक्षक श्री. राजतिलक बागवे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंगला बागवे यांनी सपरिवार समाधिमंदिरात श्रींची पाद्यपूजा केली. तर, बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. रघुनाथ आहेर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. वंदना आहेर यांच्या हस्ते रुद्राभिषेक करण्यात आला. ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर दुपारी १२ वा. दहीहंडी कार्यक्रम होऊन माध्यान्ह आरती झाली.

उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन संस्थानच्या वतीने दर्शनरांगेसह ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



करण्यात आली होती. तसेच श्रीरामनवमी उत्सवाकरिता आलेल्या पालख्यांतील पदयात्रींची निवासाची व्यवस्था साईधर्मशाळा येथे नाममात्र दरात करण्यात आली होती. याचप्रमाणे पदयात्रींना सुखकर व सुलभतेने बाबांच्या दर्शनाचा लाभ मिळावा म्हणून बायोमेट्रिक पासेसचे स्वतंत्र काऊंटर सुरू करण्यात आले होते. मुंबई-शिर्डी महार्गावर पालख्यांतील पदयात्रींकरिता ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या टँकर्सची व्यवस्था करण्यात आली होती. तर, आवश्यकतेनुसार तातडीची वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून फिरते वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले होते.

श्रीरामनवमी उत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्रीरामनवमी उत्सवात प्राप्त झालेली देणगी...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने शुक्रवार, दिनांक १२ एप्रिल ते सोमवार, दिनांक १५ एप्रिल २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या श्रीरामनवमी उत्सवामध्ये रुपये ०४ कोटी १६ लाख इतकी देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री. ठाकरे म्हणाले, दिनांक १२ एप्रिल ते १५ एप्रिल २०१९ या कालावधीत रोख स्वरूपात एकूण रुपये ०४ कोटी १६ लाख देणगी प्राप्त झाली असून, यामध्ये दक्षिणापेटीमोजणी रुपये ०१ कोटी ९२ लाख ७६ हजार ५२७, देणगीकाऊंटर ९८ लाख २० हजार ७७४ रुपये, डेबिट-क्रेडिट कार्ड, ऑनलाईन, चेक, डी.डी., मनीऑर्डर आदींद्वारे रुपये ०१ कोटी ११ लाख ५८ हजार ९७८, सोने १९८.४०० ग्रॅम, रक्कम रुपये ७.६१ लाख व चांदी ४१०२.६० ग्रॅम, रक्कम रुपये १.११ लाख, १४ देशांचे परकीय चलन अंदाजे रुपये ४ लाख ९० हजार ८६० यांचा समावेश आहे.

श्रीरामनवमी उत्सवाच्या कालावधीत ०१ लाख ८० हजार ६७० साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला. यामध्ये टाइम बेस, जनसंपर्क कार्यालय व ऑनलाईन या सेवांचा समावेश असून, ऑनलाईन व सशुल्क दर्शन/आरती पासेसव्दारे ६७ लाख ६१ हजार ४०० रुपये प्राप्त झालेले आहेत. तसेच, उत्सवकालावधीमध्ये श्री साईप्रसादालयामध्ये सुमारे ०१ लाख ९४ हजार ५२७ साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतला, तर दर्शनरांगेत ०१ लाख ९५ हजार ४०० साईभक्तांना मोफत बुंदीप्रसाद पाकिटांचे वाटप करण्यात आले. या कालावधीत ०२ लाख १६ हजार ८०० प्रसादरूपी लाडूपाकिटांची विक्री करण्यात आली. साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा येथे ४५ हजार ८३३ साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आली. अतिरिक्त निवासव्यवस्थेकरिता उभारण्यात आलेल्या मंडपांमध्ये सुमारे ०५ हजार साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आली. तसेच, साईधर्मशाळा येथे ५६ पालख्यांची निवासव्यवस्था करण्यात आल्याचे श्री. ठाकरे यांनी सांगितले.

या प्रसंगी मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री. बाबासाहेब घोरपडे व प्रशासकीय अधिकारी डॉ. आकाश किसवे उपस्थित होते.



शनिवार, दिनांक ६ एप्रिल, २०१९ रोजी गुढीपाडव्यानिमित्त श्री साईबाबा समाधिमंदिर व मंदिरपरिसरात अमेरिका येथील देणगीदार साईभक्त श्री. तारेश आनंद यांच्या देणगीतून फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली.



गुढीपाडव्यानिमित्त गुढीची विधिवत पूजा करताना संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दीपक मुगळीकर, त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. जयश्री मुगळीकर व चिरंजीव गौरव मुगळीकर... यावेळी संस्थानचे विश्वस्त श्री. बिपीनदादा कोल्हे, विश्वस्त तथा शिर्डीच्या नगराध्यक्षा सौ. योगिताताई शेळके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे, पोलीस उपनिरीक्षक श्री. मधुकर गंगावणे, सौ. सरस्वती वाक्चौरे, प्र. मंदिरप्रमुख श्री. रमेश चौधरी व कर्मचारी उपस्थित होते.








जागतिक कामगार व महाराष्ट्र दिनानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दीपक मुगळीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर ध्वजाला मानवंदना देण्यात आली. त्यानंतर श्री. मुगळीकर यांचे प्रसंगोचित भाषण झाले.

# रामनवमी उत्सवातील साईसमाधिमंदिराची विद्युत रोषणाई...



मे-जून २०१९

# साईलीला

RNI Regd. No. : MAH/MAR/2001/10353

रामनवमी उत्सवानिमित्त शिर्डी गावातून

## श्रींच्या सुवर्ण रथाची मिरवणूक - क्षणचित्रे





प्रकाशक व मुद्रक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक मधुरा प्रिंट सोल्युशन्स, बी-२४, अंबड एम.आय.डी.सी., नाशिक येथे छापून साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४ येथे प्रकाशित केले.

* संपादक : मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी * कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे ९८८१९०९७७५